रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १९६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## आजपासून चौलची दत्तयात्रा

**चौल :** अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्तगुरुंच्या यात्रेला शनिवारपासून (दि. १४) प्रारंभ होणार आहे. पाच दिवस भरणारी ही यात्रा बुधवारपर्यंत असणार आहे. यात्रेनिमित्त चौल परिसर गजबजला असून, राज्यभरातून विक्रेते याठिकाणी आले आहेत. अलिबाग बस स्थानकातून पुढील पाच दिवस भोवाळे यात्रा स्पेशल एसटी बसेस ठराविक वेळेत सोडण्यात येणार आहेत, त्यामुळे यात्रेकरुंची गैरसोय टळणार आहे. त्याचप्रमाणे चौल ग्रा.पं. प्रशासक आणि रेवदंडा पोलीस ठाण्याच्यावतीने चोख व्यवस्था व बंदोबस्त करण्यात येणार आहे.

रायगड, शनिवार, दि. १४ डिसेंबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## ‘मला पदमुक्त करा’

**मुंबई :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आपल्याला पदमुक्त करावं, अशी मागणी पत्राद्वारे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे केली आहे. आता चार वर्षे झाली, जबाबदारीतून मुक्त करा. प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करुन नवीन प्रदेशाध्यक्ष नेमण्याची भूमिका पार पाडा, असे पटोले यांनी पत्रात नमूद केले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा आजवरचा सर्वात मोठा पराभव झाला आहे. त्यांना केवळ १६ जागाच मिळाल्या. या पराभवाची जबाबदारी घेऊन पटोले जबाबदारीतून मुक्त करण्याची विनंती केली आहे.

**आजचा अग्रलेख**

**अदानी-भुताची बाधा**

**वे|ध|क**

## अश्विनी भिडेंची बदली

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक असणाऱ्या अश्विनी भिडे यांची मुख्यमंत्री कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांची आता मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांना त्वरित या पदाचा कारभार हाती घेण्याचे आदेश देण्यात आले असून, पुढील आदेशापर्यंत मेट्रोच्या व्यवस्थापकीय पदाचा कार्यभार सांभाळण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयाचा पदभार हे ब्रिजेश सिंह हे पाहत होते. त्यांच्या जागी आता अश्विनी भिडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## रविवारी विस्तार

**मुंबई :** महायुतीचे सरकार येऊन आठवडा उलटून गेला तरी मंत्रिमंडळ विस्तार लटकला होता. महायुतीमधील अंतर्गत धुसफूस याला कारणीभूत असल्याचे समजते. चांगली खाती पदरात पाडून घेण्यासाठी शिंदे आणि अजित पवार गटाने भाजपाकडे तगादा लावला होता, परंतु भाजपाने साफ नकार दर्शविल्यामुळे नाराजी पसरली होती. त्यामुळे नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार कधी होणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं होतं. अखेर येत्या रविवारी १५ डिसेंबरला नव्या मंत्रिमंडळाचा विस्तार होणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, यामध्ये महायुतीचे ३४ ते ३५ मंत्री शपथ घेणार असून, त्यामध्ये भाजपचे २३ मंत्री, शिवसेना शिंदे गटाचे १३ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ९ मंत्री असतील, अशी माहिती आहे.

## कांद्याच्या दरवाढीने डोळ्यात पाणी

**मुंबई :** सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना चांगले दिवस आले आहेत. कारण, कांद्याच्या दरात चांगली वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सध्या प्रतिकिलो कांद्याला ६० ते ७० रुपयांचा दर मिळत आहे. याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होत असून, या दरवाढीमुळे ग्राहकांच्या डोळ्यातून मात्र पाणी आले आहे. आधीच महागाईने भरडलेल्या जनतेचे यामुळे आर्थिक गणित बिघडणार असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. राज्यभरात गेल्या महिनाभरापासून सातत्याने किरकोळ दर ६० ते ८० रुपये प्रतिकिलो आहे. कांद्याचे भाव पाच वर्षातील विक्रमी उच्चांकावर आहेत. निर्यातीत वाढ, मागणीत वाढ, खराब हवामान अशी कांद्याच्या दरात वाढ होण्याची कारणे आहेत.

# जेएसडब्ल्यूत ‘प्रदूषण’चा धूर



**कंपनीचा मनमानी कारभार; प्रशासनाचेही दुर्लक्ष**

**| पेण | विशेष प्रतिनिधी |**

पेण-अलिबाग रस्त्याची दुरवस्था, अवजड वाहनांमुळे होणारे अपघात, वाहतूक कोंडी अशा एक ना अनेक कारणांमुळे वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनी चर्चेत असते. यामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रदूषण. याबाबत अनेक तक्रारी करुनही ग्रामस्थांचा विरोध झुगारुन डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या मनमानी कारभाराला महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळही सहकार्य करीत असल्यामुळे स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या प्रदूषणाचा फटका पेण व अलिबाग तालुक्याला सर्वाधिक प्रमाणात बसतो. पेण-अलिबाग मार्गावरुन प्रवास करताना त्याचा प्रत्यय प्रत्येकालाच येतो. कंपनीतील धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वसनाचे आजार जडले आहे. मात्र, तरीही कंपनीतून प्रदूषण होत नसल्याचा दावा कंपनी प्रशासनासह प्रदूषण मंडळाकडूनही केला जात आहे, ही दुर्दैवी बाब आहे. या कंपनीतील प्रदूषणाविरोधात अनेकदा तक्रारी करण्यात आल्या असल्या तरी संबंधित यंत्रणा मात्र सोयीस्कररित्या कानाडोळा करत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागत आहे.

कंपनीकडून हरितपट्टा नियम धाब्यावर बसवण्यात आल्याने नागरिकांना कंपन्यांमधून निघणाऱ्या धूर आणि वायू प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागतो. दुसरीकडे प्रदूषण मंडळाचे अधिकारी कारवाई करताना नियमाला बगल देत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

अनेकदा तक्रारी करुनही प्रदूषण नियंत्रण मंडळाचे •> पान २ वर

### श्वसनाच्या रुग्णांत वाढ

पेण व अलिबाग शहरातील अनेक दवाखान्यांमध्ये श्वसनाच्या आजारांच्या रुग्णांची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचप्रमाणे कर्करोगाचे प्रमाणदेखील वाढल्याचे चित्र दिसत आहे. असे असले तरी प्रदूषण मंडळाकडून कंपनीला प्रदूषण होत नसल्याचा दाखला दिला जात आहे, ही आश्चर्यकारक बाब आहे.

### त्रास स्थानिकांना, रोजगार परप्रांतियांना

औद्योगिकीकरण म्हटल्यावर प्रदूषणासह रोजगारही येतो. मात्र, अलिबाग आणि पेणकरांच्या नशिबी उपेक्षाच असल्याचे दिसून येते. कारखाना पेणमध्ये असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधीतून कंपनीने अनेकदा डावलले असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे प्रदूषण पेण व अलिबाग तालुक्याने सहन करायचे, मात्र रोजगार परप्रांतियांना द्यायचा, हे कंपनी प्रशासनाचे तत्त्व पेण व अलिबाग तालुक्याने का मान्य करावे, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

### कंपनीचा खोटा दावा

जेएसडब्ल्यूने मोठ्या प्रमाणात खर्च करून खारेपाटात मॅग्रोजची लागवड केली असल्याचा दावा कंपनीच्या जनसंपर्क कार्यालयातून करण्यात आला. परंतु, खरंच लागवड झाली असती तर, मॅग्रोजची वाढ झालेली आपल्याला पाहायला मिळाली असती. खारेपाट हद्दीमध्ये कृषीवलच्या प्रतिनिधींनी जाऊन कोणत्या भागामध्ये मॅग्रोज लावले आहे, हे शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु, मॅग्रोजची लागवड कोठेच झाल्याचे आढळून आले नाही.

# ‘पुष्पा’ फेम अभिनेता अल्लू अर्जुनला अटक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



तेलुगु चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेता अल्लू अर्जुन याला पोलिसांनी अटक केली आहे. हैदराबादमध्ये दि. ४ डिसेंबर रोजी ‘पुष्पा २’ च्या प्रिमिअरला चेंगराचेंगरी झाली होती. त्या घटनेत एका ३९ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, तर तिचा मुलगा जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी शुक्रवारी (दि. १३) अल्लू अर्जुनला अटक करण्यात आली. त्याला नामपल्ली न्यायालयात हजर केले असता, १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. अटकेपासून सुटका मिळविण्यासाठी तेलंगणा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

दरम्यान, याप्रकरणी मृत महिलेल्या पतीने अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्याची तयारी दर्शवली आहे. महिलेचा पती भास्कर याने माध्यमांशी बोलताना सांगितले की, अल्लू अर्जुनविरोधातील तक्रार मागे घेण्यास मी तयार आहे. चेंगराचेंगरीच्या प्रकरणात •> पान २ वर

# सवतींमध्ये भांडण; गुन्हा दाखल

**| महाड | प्रतिनिधी |**

घटस्फोटीत पहिल्या पत्नीने दुसऱ्या पत्नीच्या कामाच्या ठिकाणी जबरदस्तीने प्रवेश करून तेथील सामानाची व वस्तूची मोडतोड करून धमकी दिल्याप्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून दिलेल्या माहितीनुसार, यातील फिर्यादी आणि आरोपी या एकमेकींच्या सवत असून, आरोपी या फिर्यादी यांच्या पतीच्या पूर्वाश्रमीच्या घटस्फोटीत पत्नी आहेत. फिर्यादी मनीषा रामजी गुप्ता (५६), रा. नांगलवाडी महाड या बिरवाडी येथील पॅनरोमा केम पेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये डायरेक्ट पदावर आहेत. बुधवारी (दि. ११) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास आरोपी अर्चना रामजी गुप्ता यांनी फिर्यादी यांच्या कंपनीमध्ये विनापरवानगी जबरदस्तीने प्रवेश करून आवारातील सिक्युरिटी केबिनच्या काचा फोडल्या, कर्मचारीवर्गास शिवीगाळ केली तसेच काम बंद करण्यास सांगून कंपनी जाळून टाकण्याची धमकी दिली.

याप्रकरणी मनीषा गुप्ता यांनी अर्चना गुप्ता यांच्याविरोधात महाड एमआयडीसी •> पान २ वर

# निकृष्ट दर्जाच्या धान्याचा पुरवठा

**मध्यान्ह योजनेचा बोजवारा; तीन-तीन महिने धान्यच नाही**

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यात मध्यान्ह योजनेचा बोजवारा उडाला असून, तीन-तीन महिने कित्येक शाळांना धान्याचा पुरवठाच झालेला नाही. त्यातच पुरवठा करण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याचा सांगण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नुकतेच पोषण आहार राज्यस्तरीय समितीने पेण तालुक्यातील शाळांना भेटी दिल्या. परंतु, या समितीने खरे पाहता मध्यान्ह भोजन आहार धान्य पुरवणाऱ्या ठेकेदाराचे गोडाऊन तपासणे करणे गरजेचे होते. कारण, मध्यान्ह भोजन आहारासाठी येणारे धान्य हे निकृष्ट दर्जाचे येत असून, त्याचा सर्व दोष मध्यान्ह भोजन आहार तयार करून देणाऱ्या बचत गटांना दिला जातो.

पेण शहराचा विचार करता कित्येक शाळांना धान्यपुरवठा न झाल्याने बचत गट मध्यान्ह भोजन आहार शिजवण्यास तयारदेखील नाहीत. पोषण आहार राज्यस्तरीय समितीने या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे होते. परंतु, ही समिती आली आणि कागदी घोडे नाचवले आणि गेली. आजच्या स्थितीला बचत गटांची अवस्था खूपच नाजूक असून, त्यांच्याकडे धान्यही उपलब्ध नाही.

तीन महिने धान्यपुरवठा होत नाही याकडे ना मुख्याध्यापकांचे लक्ष, ना गटशिक्षण अधिकाऱ्यांचे लक्ष, ना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे लक्ष. •> पान २ वर

### बचत गट मेटाकुटीस

पेण तालुक्यात जिल्हा परिषदेच्या जवळपास १९० शाळा आहेत. गेली तीन महिने यातील कित्येक शाळांना धान्याचा पुरवठाच केला गेला नाही. त्यामुळे ही बचत गट उसनवार करून मध्यान्ह भोजन आहार विद्यार्थ्यांना पुरवत आहेत. असे असताना शाळेच्या मुख्याध्यापिकांचा तोरा आणखी वेगळाच असतो. त्यामुळे अक्षरशः मध्यान्ह भोजन आहार तयार करून देणारे बचत गट मेटाकुटीस आले आहेत. तीन-तीन महिने धान्यपुरवठा होत नाही, त्यातच बिलही मिळत नाही. त्यामुळे दुकानदार बचत गटांच्या महिलांना दुकानात उभेही करत नाहीत.

# सहलीसाठी आली नि पळून गेली

**प्रियकरावर अपहरणाचा गुन्हा दाखल**

**| महाड | प्रतिनिधी |**

रायगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या शैक्षणिक सहलीमधील एक विद्यार्थिनी आपल्या प्रियकराबरोबर तिथूनच पळून गेली. या घटनेने सहलीमधील विद्यार्थिनी, शिक्षक वर्गदेखील चांगलाच हादरला. सदर घटना पोलिसांना कळतात त्यांनी शोध घेतला असता सदर विद्यार्थ्यांनी आलेल्या प्रियकराबरोबर पळून गेल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी महाड तालुका पोलिसांनी प्रियकरावर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

महाड तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जळगाव जामनेर येथून एका शैक्षणिक संस्थेची सहल किल्ले रायगड पाहण्यासाठी आले होते. रायगडावरून खाली उतरल्यानंतर परतत असताना एक विद्यार्थिनी गाडीमध्ये कमी असल्याचे शिक्षकांच्या निदर्शनास झाले. सदर विद्यार्थिनीने आपल्या सोबत असलेल्या मैत्रिणींना तुम्ही पुढे व्हा मी मागून येते असे सांगितले होते. एक विद्यार्थिनी कमी असल्याचे निदर्शनास येतात शिक्षकांचे देखील धाबे दणाणले. याबाबतची खबर शिक्षकांनी पोलिसांना दिली. यावरून पोलिसांनी शोध घेणे सुरू केले असता येथील खर्डी गावाजवळ सदर विद्यार्थ्यांनी एका तरुणाबरोबर दुचाकीवरून जात असल्याचे दिसून आले. यावरून शोध घेतला असता जामनेर येथील १९ वर्षीय तेजस पाटील या प्रियकराबरोबर सदर विद्यार्थिनी गेली असल्याचे स्पष्ट झाले.

तेजस पाटील हा सहलीबरोबरच जामनेर येथून बसचा •> पान २ वर

# मालमत्ता करवाढीविरोधात नागरिकांचे ठिय्या आंदोलन

- **कर कमी केला नाहीतर आम्ही राजीनामे देऊ**
- **उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांचा नागरिकांना शब्द**

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर नगरपंचायतीने मालमत्ता करवाढीच्या नोटिसा नागरिकांना बजावल्या गेल्यामुळे नागरिकांमधून प्रचंड उद्रेक झाला असून, शुक्रवार (दि.१३) रोजी सर्वसाधारण सभेच्या वेळी नगरपंचायतीच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करीत प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. उपस्थित नगरसेवकांनी सभेत करवाढीला विरोध केला असल्याची माहिती उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांनी देत करवाढ कमी झाली नाहीतर वेळप्रसंगी सर्व नगरसेवक राजीनामे देऊन नगरपंचायत बरखास्त करू, असा शब्द जंगम यांनी दिला आहे.

तालुक्याचे ठिकाण असलेल्या खालापूर •> पान २ वर

# गॅसशवदाहिनी लवकरच वापरात

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

पालिकेत समाविष्ट कामोठे वसाहतीत सिडकोतर्फे बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे पालिकेकडे हस्तानंतरण झाले आहे. या स्मशानभूमीत सिडकोच्या माध्यमातूनगॅसशवदाहीनीबांधण्यात आली आहे. गॅस जोडणी नसल्यामुळे बांधकाम होऊनही बंद असलेल्या या दाहिनीला गॅस जोडणी करण्यात आल्याने लवकरच ही शवदाहिनी वापरात येणार असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पनवेल शहरातील अमरधाम स्मशान भूमी, खारघर येथील स्मशान भूमीत गॅसशवदाहीनीची सुविधा उपलब्ध आहे.पालिकेच्या माध्यमातून उपलब्ध आलेल्या या सुविधेचा वापर करण्यासाठी पालिके मार्फत •> पान २ वर

**सिडकोकडून पालिकेकडे हस्तांतरण**



> पालिका हद्दीतील स्मशानभूमीत अंत्यविधीकरिता लागणारी लाकडं पालिकेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जातात. याकरिता पालिका अत्यंत कमी शुल्क आकारते. मात्र, लाकडावर करण्यात येणाऱ्या अंत्यविधीमुळे प्रदूषण होत असल्याने जास्तीत जास्त अंत्यविधी गॅसशवदाहिनीवर केले जावेत, यासाठी पालिका प्रशासन काम करत आहे.
>
> – डॉ. वैभव विधाते, उपायुक्त



# श्रीवर्धनमध्ये सीआरझेडचे सर्रास उल्लंघन

**समुद्रकिनारी धनदांडग्यांची अनधिकृत बांधकामे**

**| श्रीवर्धन | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये सीआरझेड कायद्याचे सर्रासपणे उल्लंघन सुरू असल्याची बाब समोर आली आहे. श्रीवर्धन तालुक्याची भौगोलिक परिस्थिती पाहता दिघी ते बागमांडले असा ५२ किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या समुद्रकिनाऱ्यावरती असंख्य गावेदेखील वसलेली आहेत. मात्र, सध्या मुंबई, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील अनेक धनदांडगे समुद्रकिनारी जागा विकत घेऊन, त्या ठिकाणी रिसॉर्ट्स, बंगले बांधण्यासाठी इच्छुक आहेत. तर अनेक धनदांडग्यांनी आपल्या इमारती, बंगले, रिसॉर्ट्स इत्यादी समुद्रकिनारी कोणत्याही परवानग्या न घेता बांधूनदेखील टाकल्या आहेत.

लोकसभेनंतर नुकत्याच राज्यामध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. या निवडणुकांची सर्व जबाबदारी ही महसूल विभागावरती असते. याचाच फायदा अनेक धनदांडग्यांनी उचलून आपली अनधिकृत बांधकामे उभी केली आहेत. संपूर्ण महसूल प्रशासन निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये असताना अन्य कामांमध्ये लक्ष देण्यास त्यांना खरोखरच वेळ नव्हता का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

किनारपट्टीपासून पाचशे मीटरच्या अंतरापर्यंत सीआरझेड कायदा लागू असतो. यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही. परंतु, श्रीवर्धन तालुक्यातील खारगाव आरावी ग्रामपंचायत, भरडखोल ग्रामपंचायत, दिवेआगर ग्रामपंचायत, सर्वे, आदगाव ग्रामपंचायत या सर्व ठिकाणी अशा प्रकारची अनेक अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. •> पान २ वर

**गवत, झुडपांच्या विळख्याने झाले भकास**

# चौलच्या वन उद्यानाकडे दुर्लक्ष

**स्थानिकांसह पर्यटकांची घोर निराशा**





**प्रमोद जाधव**

**| अलिबाग |**

अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे येथे उभारण्यात आलेल्या वन उद्यानाची अवस्था बिकट झाली आहे. या उद्यानाला गवत, झुडपांनी विळखा घातला आहे. त्यामुळे तो संपूर्ण परिसर भकास झाला आहे. पर्यटन व स्थानिकांच्या दृष्टीने फिरण्यासाठी महत्त्वाचे असलेले हे ठिकाणी दुर्लक्षित झाले आहे. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांची घोर निराशा झाली आहे. वनविभाग याकडे लक्ष देईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पर्यटनवाढीला चालना देण्याबरोबरच वनांचे •> पान २ वर

> चौलमधील वन उद्यान सामाजिक वनीकरण विभागाकडून वर्ग झाले आहे. त्याची पाहणी करण्याच्या सूचना वनपाल यांना केल्या आहेत. त्या ठिकाणी काही सुविधा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही केली जाईल.
>
> – नरेंद्र पाटील, वनपरिक्षेत्र अधिकारी, अलिबाग

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१४ डिसेंबर**

१) श्री. रमाकांत दगडूजीराव गोळे
कामतआळी अलिबाग, १४-१२-१९४१

२) श्रीम.अरूणा बळवंत वालेकर
ब्राम्हणआळी, अलिबाग,१४-१२-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. सौ कलावती भवानजी देढी या, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**दत्ताराम जानू तांडेल स्मरणार्थ कोळीवाडा अलिबाग**

## आज दत्तजयंती उत्सव सोहळा

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील कोलाड येथील पोलीस ठाण्यात शनिवार, दि. १४ डिसेंबर रोजी दत्तजयंती उत्सव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.

कोलाड पोलीस ठाण्यात होणाऱ्या दत्तजयंती उत्सवानिमित्ताने कोलाड परिसरातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहून दत्त दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अशी विनंती कोलाड पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक नितीन मोहिते, पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी वृंद यांच्याकडून करण्यात आली आहे.

# डॉ. आंबेडकर स्मारकाची सुरक्षा धोक्यात

## व्यावसायिक परवानगी देताना नियम धाब्यावर; पालिकेसह पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

**। महाड । प्रतिनिधी ।**

**ऐतिहासिक महाड शहरात उभ्या राहिलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकासमोर व्यावसायिक परवानगी देताना पालिकेने नियम धाब्यावर बसवले आहेत. तर, पोलीस प्रशासनदेखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. शिवाय, राष्ट्रीय स्मारकाची सुरक्षादेखील धोक्यात आली आहे. याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयाने लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.**



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडमध्ये सामाजिक समतेची बीजे रोवली. यामुळे महाडचे नाव जागतिक पटलावर नोंदवले गेले. मात्र, या ऐतिहासिक शहरामध्ये वाहतुकीचे आणि शहर नियोजनाचे तीनतेरा वाजले आहेत. शहरातील सर्वच भागात बेशिस्तपणे वाहने पार्किंग केली जात असल्याने मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. ही समस्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. शहरामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभ्या राहिलेल्या राष्ट्रीय स्मारकासमोर इमारत परवानगी देताना नियम धाब्यावर बसवून महाड नगरपालिकेने परवानगी दिली आहे. याबाबतीत वारंवार तक्रारी होऊनदेखील कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या ठिकाणी आपला बाजार आणि आरसी का इलेक्ट्रॉनिक्स या दोन व्यावसायिक दुकाने सुरू झाली आहेत. यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरच वाहने पार्किंग केली जात आहे. ग्राहक आपले वाहन रस्त्यावर पार्किंग करून तासनतास खरेदी करतात. शिवाय राष्ट्रीय स्मारकाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच विनापरवानगी रिक्षा उभ्या केल्याजात आहे. यामुळे धोतर्फा वाहन पार्किंग होऊन ये-जा करणाऱ्या वाहनांना त्रास होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या ठिकाणी २० मार्च रोजी लाखो भीमसैनिक भेट देत असतात शिवाय शासकीय कार्यक्रम तसेच निवडणुकांचे कार्यक्रमदेखील याच ठिकाणी होत असतात. यामुळे राष्ट्रीय स्मारकासमोर कायम वाहनांची गर्दी असते. आता याच स्मारकासमोर व्यावसायिक इमारतीला परवानगी देत असताना केवळ रहिवासी पार्किंगचा नियम लावून इमारतीला पार्किंग देण्यात आली आहे. मात्र, या ठिकाणी आपला बाजार आणि आरसीका इलेक्ट्रॉनिक्स असे दोन मोठे व्यवसाय सुरू असल्याने या ठिकाणी येणारे ग्राहक आपल्या वाहनांची पार्किंग रस्त्यावरच करून जातात. त्यातच आपला बाजार मध्ये ग्राहकांना घेऊन येणारे रिक्षा चालक स्मारकाच्या मुख्य द्वारासमोरच पार्किंग करून बसून राहतात. यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. याबाबत नगरपालिका आणि पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. शहर नियोजनामध्ये पालिका प्रशासनाकडून काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याने याबाबतीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशा प्रकारची मागणी देखील नागरिकांकडून केली जात आहे.

> **या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत सदर इमारतीला आणि त्या ठिकाणी असलेल्या दुकानांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. याबाबत उपाययोजना न झाल्यास कारवाई केली जाईल.**
>
> **- धनंजय कोळेकर, मुख्याधिकारी, महाड नगरपालिका**

## शहरात भटक्या कुत्र्यांची दहशत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत शहरात मागील काही महिन्यांपासून भटके कुत्रे ही मोठी समस्या बनली आहे.कर्जत नगरपरिषदेकडून कुत्रे पकडण्याची मोहीम यशस्वी होत नसल्याने कुत्र्यांची संख्या वाढली आहे. भटक्या कुत्र्यांची वाढलेली संख्या यामुळे शहरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली आहे.

दरम्यान, कर्जत शहर भटक्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम कधी सुरु करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. कर्जत नगरपरिषदेकडूनदेखील भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण करण्याची मोहीम आखली आहे. मात्र, या कामाचा ठेका देण्यात आलेली संस्था काम करीत नाही. त्यामुळे पालिका त्या ठेकेदाराला पोसते कशासाठी, असा प्रश्न सर्वसामान्य कर्जतकरांना पडला आहे. शहरातील नागरिक हे वाढलेल्या कुत्र्यांच्या समस्येमुळे अडचणीत आले आहेत.

कर्जत शहरातील एकही भाग आणि आळी ही भटक्या कुत्र्यांशिवाय मोकळे आहे, अशी परिस्थिती नाही. त्यामुळे भटक्या कुत्र्यांपासून वाचण्यासाठी नागरिक विविध नवीन मार्ग शहरत शोधत आहेत. पण, तरीदेखील त्या प्रत्येक रस्त्यावर भटके कुत्रे आढळून येत असल्याने कर्जत शहरातील नागरिक पालिकेकडे भटक्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी करीत आहेत.

## संत रोहिदास नगरमध्ये दूषित पाणीपुरवठा

### नगरपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातील संत रोहिदास नगरमध्ये गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असून, ग्रामस्थांनी याबाबत माहिती देऊनही नगरपंचायत प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.

तळा शहरात काही भागात धरणाजवळअसलेल्याबोअरिंगमधून, तर काही भागात आंबेळी येथून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, आंबेळी येथून गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पाण्यात कचरायुक्त गाळ, प्राण्यांची कातडी, जंतू अशा प्रकारे दूषित पाणी नळाद्वारे येत आहे. याबाबत नागरिकांनी नगरपंचायत कर्मचाऱ्यांना कळवूनदेखील कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. या दूषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांना साथीचे आजार होण्याची शक्यता आहे. तसेच येथील लहान मुले आजारी पडू लागल्याने गेल्या दहा दिवसांपासून येथील नागरिकांना दैनंदिन जीवनासाठी विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. याबाबत ग्रामस्थांतर्फे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असून, त्यानंतरही कार्यवाही झाली नाही तर नगरपंचायतीवर मोर्चा काढण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल,१.सौ.धनश्री सुभाष ढाकवळ, आणि २. सौ. संगीता हरेश घुडे, यांनी जमीन मालक काळूराम हरिभाऊ घुडे, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**- मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - जामरुंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३८/१ | १.०८.०० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे अविभक्त हिस्स्याचे व भोगवटासदरी नावे असलेले ०.२०.०० हे. आर. पॉ. इतके क्षेत्र विकत दिलेले आहे | ६.८१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि. १४/१२/२०२४

IIFL FINANCE

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **17.12.2024 रोजी दुपारी 01:00 ते 03:30** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **24.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **नागोठणे-मोनालिसा कॉम्प्लेक्स - आयआयएफएल फायनान्स, नागोठणे शांती नगर, बाजार बेथ रोड, मुथूट फायनान्स समोर , नागोठणे , पिन- 402106**

**शाखेचे नांव: अलिबाग- श्री बाग जीएल, तालुका - अलिबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30734805, GL32049890, GL32484528, GL30532339, GL31994235, GL32437501, GL32213976, GL31156603, GL31140249, GL31117203, GL32556368, GL32498229, GL30543482, GL32438256, GL32010852, GL32228469, GL31174401, GL31142569.

**शाखेचे नांव: महाड-रायगड जीएल, तालुका - महाड.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32697535, GL32578212, GL32566021, GL32578926, GL23391470, GL23392309, GL30611085, GL32531105, GL32104494, GL30593213, GL30580855, GL32547540, GL32516424, GL27280275, GL32466638, GL30465182, GL23787356, GL30455575, GL30434754, GL32363888, GL31159633, GL30411889, GL32265137, GL31697420, GL31477553, GL33194621, GL31136075, GL32581882, GL32582066, GL32550328, GL30593805, GL27116503, GL32654373, GL30450537, GL31175329, GL30421308, GL32284167, GL31704392, GL31491019, GL31144709.

**शाखेचे नांव: माणगाव-माणगाव मुंबई गोवा रोड जीएल, तालुका - माणगाव.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32698675, GL30697634, GL31843633, GL32606307, GL30613912, GL32523466, GL32510882, GL32452619, GL32387665, GL30467592, GL30465985, GL30794024, GL32331580, GL32248443, GL32210592, GL32188494, GL30092458, GL31067743, GL30880366, GL30711351, GL31851687, GL30627683, GL32524794, GL32469262, GL32395159, GL32486059, GL30485152, GL32338516, GL32255843, GL32226310, GL32195031, GL30109077, GL31072044.

**शाखेचे नांव: मुंबई एनएम-पेण नगरपालिका इमारत जीएल, तालुका - पेण.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30747129, GL30735764, GL30701884, GL32580045, GL32564546, GL24699481, GL30618644, GL30608015, GL32461202, GL32419811, GL30471506, GL30463789, GL30454591, GL30425891, GL23249003, GL32318022, GL32237917, GL30759789, GL30813350, GL30713244, GL33689556, GL31538372, GL30624818, GL30626481, GL32438443, GL30480001, GL30483073, GL31484603, GL32577855, GL32338043, GL32255578.

**शाखेचे नांव: मुंबई-रोहा जीएल, तालुका - रोहा .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30755981, GL30756726, GL32523556, GL32509203, GL32520234, GL30547603, GL30530577, GL30527394, GL32452992, GL32431510, GL32427660, GL30664587, GL32371461, GL32071602, GL23249628, GL32291915, GL32279328, GL32274335, GL32204979, GL32192590, GL31293301, GL28285564, GL27860403, GL30757357, GL30757579, GL32527822, GL30542950, GL32018880, GL30542055, GL32381106, GL30682585, GL31802774, GL31348337, GL32405400, GL32291905, GL32347898, GL32309292, GL32281653, GL32285732, GL32228945, GL32193599, GL28303885, GL27865802.

**शाखेचे नांव: नागोठणे-मोनालिसा कॉम्प्लेक्स, तालुका - रोहा**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL31868570, GL32533111, GL32478505, GL30455782, GL26908424, GL31876243, GL32550873, GL32499422.

**शाखेचे नांव: पोयनाड नसरापूर जीएल , तालुका - अलिबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL25270243, GL30747087, GL32706957, GL31409005, GL30694046, GL30680340, GL32543457, GL32324496, GL30759720, GL30715617, GL30681557, GL32340576.

**शाखेचे नांव: रेवदंडा-रेवदंडा जीएल , तालुका - अलिबाग.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30459288, GL30473591, GL30477910, GL32224156, GL30474924.

**शाखेचे नांव: श्रीवर्धन-श्रीवर्धन जीएल, तालुका - श्रीवर्धन.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32319304, GL32402875, GL30457299, GL30466082, GL30472630, GL32333942, GL32305452, GL32338668, GL30477427, GL30485211, GL32339727, GL32307090.

**शाखेचे नांव: सुधागड पाली-पाली जीएल , तालुका - सुधागड-पाली**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32548103, GL32508785, GL30428159, GL29755187, GL31348083, GL32527740, GL30448124, GL29768987, GL31367805.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 14.12.2024**
**स्थळ: रायगड**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

**पान १ वरून**

## जेएसडब्ल्यूत 'प्रदूषण'चा धूर

नियम पायदळी तुडवत कंपनी प्रशासन रासायनिक वायू सोडत आहे. यावरुन प्रदूषण मंडळ केवळ नोटिसा बजावण्यापुरतेच सक्रिय असल्याचे दिसते. कंपनीतून सोडल्या जाणाऱ्या प्रदूषित वायुमुळे अलिबाग तसेच पेण तालुक्यातील प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. कंपनीवर राष्ट्रीय हरित लवादाची कारवाईची टांगती तलवार असतानाही कंपनी प्रशासनाला भय नाही. त्यामुळे स्थानिकांनी संताप व्यक्त केला आहे.

**स्क्रबर सिस्टीमचा वापर होतोय का?**

या कंपनीतून लोखंडावर प्रक्रिया करताना निघणारी रसायने व धुलीकण असलेला वायू संपूर्ण आकाश व्यापून टाकतो. कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे वायू प्रदूषण होऊ नये यासाठी स्क्रबर सिस्टीमचा वापर गरजेचा असतो. परंतु, ही प्रक्रिया खर्चिक असल्याने कारखान्यांकडून तिचा वापर केला जात नसल्याचा आरोपही स्थानिकांनी केला आहे.

**जेएसडब्ल्यू येथील धुरामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत असलेल्या तक्रारीची दखल प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतली जाते. तरीदेखील त्याची अंमलबजावणी होत नसल्यास संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रारीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या जातील.**

**- संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड**

## मालमत्ता करवाढीविरोधात नागरिकांचे ठिय्या आंदोलन

नगरपंचायतीच्या माध्यमातून शहरात नागरी मूलभूत सोयी सुविधा नाहीत, पिण्याच्या पाण्याची सोय नाही. अशी परिस्थिती असतानाच शासनाकडून मालमत्ता करात वाढ करून नागरिकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केल्याने नगरपंचायतीच्या सर्वसाधारण सभेच्या दिवशी खालापूर शहरातील नागरिकांनी नगरपंचायतीच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते नवीन घाटवळ, उमेश गावंड, महेश राठी, कौस्तुभ जोशी, वैभव भोईर, नानू सावंत यांनी आक्रमक पवित्रा घेत प्रशासनाला धारेवर धरत सर्वसाधारण सभेत करवाढीला विरोध करा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

नगराध्यक्षा रोशना मोडवे यांच्या अध्यक्षतेखाली नगरपंचायतीची सर्वसाधारण सभे घेण्यात आली. याप्रसंगी उपनराध्यक्ष संतोष जंगम, प्रभारी मुख्याध्याधिकारी वैभव गारवे, लेखापाल सुनील विश्वासराव, कर निरीक्षक जितेंद्र यादव, अक्षय लोंढे यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा होईपर्यंत नागरिक कार्यालयासमोर उभे राहिले होते.अखेर सर्वसाधारण सभा संपल्यानंतर उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांनी सभेचा इतिवृत्त वाचून दाखवत करवाढीच्या ठरावाला नगरसेवकांनी विरोध केल्याचे सांगत ठराव नामंजूर करण्यासाठी नगरसेवकांची हवे असलेली उपस्थित होती, असे सांगत प्रभारी मुख्याधिकारी, नगरसेवक आणि प्रमुख ग्रामस्थांची संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन यामध्ये करवाढ कमी झाली नाहीतर वेळप्रसंगी आम्ही सर्वजण सामूहिक राजीनामे देऊन नगरपंचायत बरखास्त करू या लढ्यात तुमच्यासोबत राहू, असा शब्द उपनगराध्यक्ष संतोष जंगम यांनी नागरिकांशी बोलताना दिला आहे.

## चौलच्या वन उद्यानाकडे दुर्लक्ष

महत्त्व स्थानिकांना समजावे, यासाठी अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळेदरम्यान सामाजिक वनीकरण विभागामार्फत उत्तमराव पाटील जैवविविधता वन उद्यान गेल्या पाच वर्षांपूर्वी बांधण्यात आले होते. रस्त्याला लागूनच काही अंतरावर हे उद्यान उभारल्याने या उद्यानात फिरण्यास येणाऱ्यांचा कलही वाढला. या उद्यानामध्ये ऐतिहासिक वास्तूंसह वेगवेगळ्या प्रकारचे खेळाचे साहित्य व वेगवेगळ्या प्राणी, पक्ष्यांचे पुतळे उभारण्यात आले होते. आजूबाजूला वेगवेगळ्या प्रकारच्या फुलझाडांनी हा परिसर फुलून गेला होता. त्यामुळे या उद्यानात येणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड वाढली. सकाळ-संध्याकाळच्या दरम्यान स्थानिक या उद्यानात फिरण्यास आवडीने येत होते. निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या या उद्यानात फिरण्याचा आनंद स्थानिक व पर्यटक मनमुरादपणे घेत होते. आबालवृद्धांपासून महिला, तरुणवर्ग मोठ्या संख्येने या उद्यानात येत होते. या उद्यानासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला होता. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिक, महिला व तरुणवर्गामध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत. या उद्यानात फिरण्याचा एक वेगळा आनंद स्थानिकांना व पर्यटकांना मिळत होता. लहान मुलेदेखील उत्स्फूर्ततेने या उद्यानात बागडत होती. परंतु, गेल्या दोन वर्षांपासून हे उद्यान बंद झाले आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांची घोर निराशा झाली आहे. उद्यानावर केलेला खर्च पाण्यात गेला आहे. या उद्यानाला गवत, झुडपाने विळखा घातला आहे. सामाजिक वनीकरण विभागाकडून आता हे उद्यान वन विभागाकडे वर्ग केले आहे. परंतु, वनविभागाकडूनदेखील त्या उद्यानाची देखभाल दुरुस्ती करण्यात आली नाही. उद्यान उभारण्यासाठी आराखडा तयार असल्याचा दावा या विभागाकडून केला जात आहे. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. चौल हा भाग ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग म्हणून ओळखला जातो. या भागात पर्यटनवाढीला चालना देण्याचा प्रयत्न वन विभागाने केला आहे. परंतु, हा प्रयत्न कधी यशस्वी होईल, याकडे लक्ष लागून राहिले आहे.

**नव्याने उभारणीसाठी वन संयुक्त समितीची प्रतीक्षा**

वनांचे संरक्षण करण्यासाठी वन विभागाने गावांतील ग्रामस्थांची मदत घेण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी संयुक्त वन समिती गठीत केली जात आहे. या समितीच्या मदतीने वन क्षेत्रात वेगवेगळ्या योजना राबवून वनांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु, चौल-भोवाळे येथील वन उद्यान नव्याने उभारण्यासाठी संयुक्त वन समितीची प्रतीक्षा लागून राहिली आहे. ग्रामपंचायतींवर प्रशासन राज असल्याने समिती गठीत करण्यास अडचण येत आहे. वन विभागाचा आराखडा तयार आहे. परंतु, समितीअभावी हे उद्यान नव्याने बांधण्याचे काम लांबणीवर जाण्याची शक्यता आहे.

## 'पुष्पा' फेम अभिनेता अल्लू अर्जुनला अटक

अल्लू अर्जुनला अटक झाल्याची मला कल्पना नाही. चेंगराचेंगरीच्या घटनेशी अल्लू अर्जुनचा काहीही संबंध नाही.दरम्यान अल्लू अर्जूनविरोधात एफआयआर दाखल झाल्यानंतर हैदराबाद पोलिसांच्या सेंट्रल झोनचे पोलीस उपायुक्त अक्षांश यादव यांनी सांगितले की, अल्लू अर्जुनवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चिक्कपडल्ली पोलीस ठाण्यात मृत महिलेच्या नातेवाईकांनी या सर्व प्रकाराबाबत तक्रार दाखल केली होती. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा नोंद केला होता. दरम्यान, चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर अभिनेता अल्लू अर्जुनने या दुर्घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. संध्या थिएटरमध्ये घडलेली घटना दुर्दैवी असून, यात मृत्युमुखी पडलेल्या महिलेच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त करतो. तसेच या कठीण काळात मी त्यांच्याबरोबर आहे. त्यांनी स्वतःला एकाकी समजू नये, मी स्वतः त्यांची भेट घेईन. पुढील खडतर वाटचालीसाठी जी मदत लागेल, ती मी करेन.

## सवतींमध्ये भांडण, गुन्हा दाखल

पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून, त्यानुसार कारवाई करत पोलिसांनी अर्चना यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून भारतीय न्याय संहिता कलमांनुसार कारवाई केली आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## निकृष्ट दर्जाच्या धान्याचा पुरवठा

सर्व अलबेल सुरू आहे. मध्यान्ह भोजन आहाराचे धान्य केव्हा मिळणार या प्रतीक्षेत बचत गटांच्या महिला धान्यपुरवठा करणाऱ्या ठेकेदाराच्या रस्त्याकडे डोळे लावून बसल्या आहेत. येत्या दोन दिवसात पेण तालुक्यातील बचत गटांना धान्यपुरवठा झाला नाही तर शाळांचा मध्यान्ह भोजन आहार बंद केला जाईल, अशी स्थिती तालुक्यात निर्माण झाली आहे. दरम्यान, याबाबत अधिकची माहिती घेण्यासाठी पोषण आहार निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी याबाबत बोलणे टाळले.

## सहलीसाठी आली नि पळून गेली

पाठलाग करत किल्ले रायगड पर्यंत आला होता. चित्त दरवाजा येथून सदर विद्यार्थिनीला सोबत घेऊन तेजस पाटील पुण्याच्या दिशेने जात असताना मोबाईल लोकेशनच्या आधारे पोलिसांनी तेजस पाटीलला ताब्यात घेतले आहे. याबाबत महाड तालुका पोलिसांनी तेजस पाटील याच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

## गॅसशवदाहिनी लवकरच वापरात

केवळ १०० रुपये शुल्क आकारण्यात येत आहे.हिंदू पद्धतीने अंत्यविधी करण्यासाठी लाकडाचा वापर केला जात असल्याने वृक्षतोड तसेच लाकडा मुळे होणाऱ्या धुरामुळे पर्यावरणाची होणारी हाणी टाळण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी गॅसशवदाहिणीचा वापर करावा या हेतूने अत्यंत अल्प दरात पालिके मार्फत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कामोठे वसाहती पाठोपाठ कळंबोली वसाहती मधील स्मशान भूमीत देखील सिडकोच्या माध्यमातून गॅसशववाहिनी बांधण्याचे काम करण्यात आले आहे. या ठिकाणी महानगर गॅस कंपनीच्या माध्यमातून गॅस जोडणी करण्यात आल्या नंतर गॅसशवदाहिणीचे पालिकेकडे हस्तानंतरण करण्यात येणार असल्याने पनवेल शहर, खारघर पाठोपाठ कामोठे आणि कळंबोली वसाहतीतदेखील गॅसवर अंत्यविधी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

## ...सीआरझेडचे सर्रास उल्लंघन

मुंबई, पुण्यातून येणारे धनदांडगे काही स्थानिक लोकांना आपल्या हाताशी धरून अशाप्रकारे अनधिकृत बांधकामे करत असल्याचे समोर आले आहे. स्थानिक नागरिकदेखील आपल्याला चिरीमिरी मिळते या कारणासाठी अशा धनदांडग्यांना अनधिकृत बांधकाम करण्यासाठी सढळ प्रकारे मदत करत असल्याचे पाहायला मिळते.

याबाबत चौकशी केली असता अनेक बांधकाम करणारे असे सांगतात की, सी.आर.झेड. कायद्यामध्ये शिथिलता आली आहे. परंतु सदर सी.आर.झेड. कायदा शिथिल केल्याबाबतचे कोणतेही जी.आर. प्रशासनाकडे उपलब्ध नाहीत. जरी राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये निर्णय झालेला असला, तरी त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी लागत असतो. मात्र, याचा गैरफायदा जर का अनधिकृत बांधकाम करणारे घेत असतील, तर त्यांच्यावर दंडात्मक अथवा तोडक कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे. जर प्रशासनाने अशा प्रकारची कारवाई केली नाही तर, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना व सी.आर. झेड. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना एका प्रकारे अभयच मिळेल, असे अनेकांचे मत आहे. याबाबत तालुक्यातील काही जागरूक नागरिक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दाद मागणार आहेत.

**ग्रामपंचायत पहेल, ता. माणगाव, जि. रायगड**

ग्रामपंचायत पहेल १५ व्या वित्त आयोग व इतर योजनेअंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ निधी अंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी दिनांक १९/१२/२०२४ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सीलबंद दरपत्रक मागविण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र | कामांचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १) | न.पा.पु.यो. पाण्याची जुनी टाकी दुरुस्त करणे. | १२७१६८ | १२७१ | २०० |
| २) | गावातील गटार दुरुस्ती करणे. | ६००८८ | ६०० | २०० |
| ३) | जय हनुमान मंदिर ते दगडू वाघोस्कर घरापर्यंत गटार बांधणे. | १००००० | १००० | २०० |
| ४) | बाजी खराडे ते विनोद कुंभार गटार बांधणे. | ५०००० | ५०० | २०० |
| ५) | वेटू मालोर ते सखाराम मालोरे घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ७०००० | ७०० | २०० |
| ६) | जयदास खराडे यांच्या घराच्या मागील आहोलाला संरक्षण भिंत बांधणे | १५८००० | १५८० | २०० |

**अटी आणि शर्ती**

१. दरपत्रके प्रक्रियेच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि. १९/१२/२०२४ रोजी सकाळी ११. वा नंतर आलेली दरपत्रके घेतली जाणार नाही.
३. प्राप्त दरपत्रके दि. १९/१२/२०२४ रोजी दुपारी १२ वा ग्रामपंचायत पहेल कार्यालयात उपस्थितांसमक्ष सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील. नामंजूर दरपत्रकाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही व बिलाची रक्कम ग्रामपंचायतीकडील तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
४. साहित्य उत्तम दर्जाचे (आयएसआय/आयएसओ मार्क प्रमाणित) असावे, पुरवठादार जीएसटी नोंदणीकृत असावा.
५. कोणत्याही एक अथवा अनेक दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा राहील.

सही /-
**ग्रामसेवक**
**सौ. श्रेया सतीश ढेपे**

सही -
**सरपंच**
**सौ. करिश्मा प्रसाद मांजरे**

निवडक

## प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

**चिरनेर :** कर्मवीर विद्या प्रबोधिनी मार्फत श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव विभाग जासई येथे रायगड विभागीय प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड विभागीय अधिकारी व विद्यालयाचे प्राचार्य एम. के. कोंगेरे यांनी उपस्थित मान्यवर पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक करून स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुरेश पाटील, अरुण जगे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या २४ शाळांचे संघ सहभागी झाले होते.

## वधू-वर पालक परिचय मेळावा

**उरण :** गळ्यात इष्टलिंग, कपाळाला भस्म व भगवान शिवाला आराध्य दैवत मानणारा, शैव संस्कृतीचे आचरण,पालन करणाऱ्या वीरशैव लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र वीरशैव सभा ठाणे जिल्हा समिती व वीरशैव लिंगायत सेवा संस्था ठाणे या सामाजिक संस्था कार्यरत असून या दोन्ही संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२९) धर्मवीर आनंद दिघे सभागृह डोंबिवली येथे वीरशैव लिंगायत धर्मातील सर्व जाती पोट जातीतील इच्छुक वधू-वर व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## मोफत आरोग्य तपासणी

**गडब :** ग्रुप ग्रामपंचायत काराव गडब, क्षितीज मल्टिपर्पज असोसिएशन पेण व तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेन्टर-नेरुळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने १५ व्या वित्त आयोगातुन गडब येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तेरणा हॉस्पीटलचे डॉ.मनोज सकपाळ, डॉ.अजित निळे, डॉ.अजित जाधव, रवींद्र कदम, रजनिश शुक्ला, चंद्रकला भनगा, रोशनी कांबळे, नंदा राऊत, उमेश निकम, जनाब मोहम्मद, राहुल मोरे यांनी तपासण्या करुन मोफत औषधे देण्यात आली.

## पशुगणनेचे काम सुरु

**चिरनेर :** उरण तालुक्यात पशुगणनेला सुरुवात करण्यात आली आहे. तालुक्यात एकूण कोड असलेली ६५ गावे व शहरी भागातील १७ वार्ड असुन त्यापैकी १५ गावांमध्ये पशुगणना सुरु आहे. तालुक्यात पशुगणना करण्यासाठी ५ प्रगणक नियुक्त केले असुन देखरेख व नियंत्रणसाठी एक पर्यवेक्षक आहे. पशुगणनेच्या या मोहिमेत गाय वर्ग, म्हैस वर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बदक, कुक्कुट या पक्षांची तसेच पशुधन क्षेत्रासाठी वापरली जाणारी उपकरणे यांची गणना केली जाणार आहे.

## दिनदर्शिका प्रकाशन सोहळा

**माणगाव :** माणगाव शहरातील माणगाव ग्रामीण बिगरशेतीसहकारीपतसंस्थामर्या.,उतेखोलयापतसंस्थेचा सन २०२५ च्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा चेअरमन आनंद यादव यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. या प्रकाशन सोहळ्यास संस्थेचे संचालक दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, नरेश राजपूत, उदय म्हशेलकर, संदीप खरंगटे, व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, कर्मचारी वरिष्ठ लेखनिक दिक्षीता जाधव, वसुली अधिकारी राजेंद्र जाधव, कॅशिअर राजेश सकपाळ, लेखनिक मयूर केकाणे, शांती गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# ई-रिक्षा कायम सुरू ठेवणार

## ग्रामस्थांच्या बैठकीत निर्णय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान शहरात पर्यावरण पूरक ई-रिक्षा या सुरूच ठेवण्याचा आग्रह माथेरान गावातील ग्रामस्थांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प संपत असल्याने माथेरानमधील ग्रामस्थ एकत्र आले होते. दरम्यान, माथेरानमधील पर्यटन वाढविणारा ई-रिक्षा या बंद करण्याचा प्रयत्न शासनाने केल्यास त्याला संपूर्ण गाव ई-रिक्षा चालक यांच्या पाठिशी उभा राहणार असल्याचे जाहीर केले.**



**माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प सुरू आहे. मागील ११ महिने ई-रिक्षा यांची वाहतूक सुरू होती आणि त्यामुळे पायलट प्रकल्प संपल्यानंतर देखील ई-रिक्षा सुरू ठेवाव्यात अशी विनंती करणारी मागणी माथेरान ग्रामस्थांनी केली आहे. रायगड जिल्हाधिकारी यांची भेट घेवून माथेरानमधील ग्रामस्थांनी ही मागणी केली असून त्यावर जिल्हाधिकारी कोणता निर्णय घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे. माथेरान ग्रामस्थांच्या मागणीचे निवेदन रायगड जिल्हाधिकारी यांना देण्यासाठी माजी उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, प्रवीण सकपाळ, तसेच किरण चौधरी, प्रदीप घावरे, राजेश चौधरी, संतोष कदम आदी ग्रामस्थ उपस्थित होते.**

माथेरानमधील ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प या महिन्यात संपत आहे. त्यामुळे या ई-रिक्षा चालक यांच्या वतीने ग्रामस्थांची बैठक लावण्यात आली होती. शहरातील कम्युनिटी सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला श्रमिक रिक्षा संघटना अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, सचिव सुनील शिंदे, माथेरान व्यापारी फेडरेशन अध्यक्ष राजेश चौधरी तसेच व्यापारी संतोष कदम, दीपक शाह ई-रिक्षा चालक शैलेश भोसले, नजिम महाबले आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी १२ वर्षे न्यायालयीन लढाई लढणारे सुनील शिंदे यांनी मागील साडे अकरा महिने सुरू असलेल्या पर्यावरणपुरक ई-रिक्षा यांचा पायलट प्रकल्प यांनी माथेरान शहरात दिलेल्या सेवेची माहिती दिली. ई-रिक्षा चालक शैलेश भोसले यांनी माथेरान शहरातील वाढलेल्या पर्यटकांबद्दल माहिती देताना गेल्या वर्षी शहरात दररोज सहाशे ते साडे सहाशे पर्यटक येत होते. आज ई-रिक्षांची वाहतूक सहज उपलब्ध होत असल्याने दररोज दोन हजारहून अधिक पर्यटक येऊ लागले आहेत. त्यामुळे शाळेसाठी १५ रिक्षा तसेच पर्यटक यांच्यासाठी ५० हून अधिक रिक्षा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यातून पर्यटन व्यवसाय अधिक बहरेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

कुलदीप जाधव यांनी आपल्या सारखे शहर असलेल्या महाबळेश्वर मध्ये इको सेन्सिटिव्ह झोन होता आणि मॉनिटरिंग कमिटीदेखील होती, मात्र तेथे जनतेने उठाव केला आणि त्यानंतर मॉनिटरिंग कमिटी शासनाने बरखास्त केली असल्याची माहिती देत आपल्या गावातील प्रश्न ठरविणारी मॉनिटरिंग कमिटी कोण सवाल केला. त्यावेळी शहरातील नागरिक आणि ग्रामस्थ यांनी थेट ई-रिक्षा यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहण्याची भूमिका घ्यायला हवी असे स्पष्ट केले.

शिवाजी शिंदे यांनी माथेरान शहरातील पर्यटन वाढीस ई-रिक्षा महत्वाचे योगदान देत असल्याने शासनाने ई-रिक्षा सुरूच ठेवल्या पाहिजेत.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात कुठेही पायलट प्रकल्प संपल्यावर ई-रिक्षा बंद ठेवल्या जातील असे कुठेही लिहिले नाही आणि त्यामुळे ई-रिक्षा सुरू ठेवण्यासाठी पाठीशी राहण्याची भूमिका स्पष्ट केली. तर प्रदीप घावरे यांनी शहरात कोणतीही समस्या उद्भवत असून रात्री दहा ही वेळ बदलून नवीन वेळ निश्चित करावी यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना केली.

गिरीश पवार यांनी ई-रिक्षा कायमस्वरुपी सुरू कशा राहतील यासाठी गावाने निर्णय घ्यावा आणि ठामपणे साथ द्यावी अशी मागणी केली. यावेळी आकाश चौधरी, चंद्रकांत जाधव, वसंत कदम, जनार्दन पारटे, किरण चौधरी, राकेश चौधरी यांनीदेखील आपली भूमिका मांडली. या बैठकीला महिला ग्रामस्थदेखील आपल्या मुलांच्या शाळेत जाणाऱ्या रिक्षा बंद होऊ नये हे सांगण्यासाठी उपस्थित होत्या.

# पावणे नऊ कोटी रुपयांचा दंड थकीत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने कारवाई केली. एक लाख ८ हजार ८३ वाहनांवर ई-चलनाद्वारे जानेवारी ते १० डिसेंबर २०२४ या कालावधीत कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईतून आठ कोटी ७७ लाख सात हजार असून १८ कोटी रुपयांचा दंड थकीत आहे.

रायगडजिल्ह्यामध्येदिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढू लागली आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे अवजड वाहनांची खरेदीदेखील मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. वर्षाला सुमारे वीस हजार पेक्षा अधिक दुचाकींची खरेदी होत असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे.

वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांवर नजर ठेवण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने ऑनलाईन पध्दतीने दंडात्मक कारवाई सुरु केली आहे. पॉझ मशीनद्वारे एका क्लीकवर दुचाकीचे छायाचित्र काढून त्या चालकाला दंडात्मक कारवाई झाल्याचा मेसेज पाठविला जात आहे. त्यानुसार त्याने कार्यालयात येऊन अथवा ऑनलाईन पध्दतीने दंड भरण्याची सोय केली आहे. काही वाहन चालक दंड भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. जिल्ह्यात वर्षभरात एक लाख २३ हजार ६७३ वाहनांवर कारवाई झाली आहे. त्यापैकी १५ हजार ५९० चालकांकडून एक कोटी १६ लाख ७० हजार ८५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. मात्र एक लाख आठ हजार ८३ चालकांकडून आठ कोटी ७७ लाख ७ हजार ६५० रुपयांचा दंड थकीत आहे. चालकांनी तातडीने दंड भरावा असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक लांडे यांनी केले आहे.

**लोक अदालतीमध्ये दंड भरा**

**ई चलनाद्वारे करण्यात आलेल्या कारवाईतून अनेक वाहन चालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. १४ डिसेंबरला लोक अदालत आहे. या अदालतमध्ये नागरिकांनी येऊन थकीत दंड भरावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

# कृषी क्षेत्रात होणार क्रांती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेत निकष सुधारुन विहीर, वीज जोडणी, पंपसंच आदींसाठी वाढीव अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील अनुसुचित जाती, जमातींच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे हा उद्देश समोर ठेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना सुरु करण्यात आली आहे.

या योजनांतून शेतकऱ्यांना नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच आदी विविध घटकांसाठी अनुदान देण्यात येते. सन २०२४-२५ आर्थिक वर्षातील लाभार्थ्यांना घटकांच्या अनुदानात वाढीव लाभ देण्यात येणार आहे. त्यामध्ये योजनेतंर्गत विहीरींचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना आता ४लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. इतर बाबीसाठी दुप्पट अनुदान वाढविले आहे. त्यामध्ये विहीर दुरुस्ती १ लाख, सतत प्लास्टीक अस्तरीकरण रु. २ लाख, इनवेल बोअर रु. ४० हजार, वीज जोडणी आकार रु. २० हजार, पंपसंच रु. ४० हजार, तुषार सिंचन रु. ४७ हजार, ठिबक सिंचन रु. ९७ हजार यंत्रसामुग्री रु. ५० हजार, पिकीसी/एचडीपीई पाईप रु. ५० हजार, परसबागेसाठी रु. ५ हजार, विंधन विहिरींसाठी रु. ५० हजार अनुदान केले आहे.

त्यामध्ये पूर्वी असलेली रु. १,५०,००० उत्पन्नाची अट काढून टाकण्यात आली आहे व नवीन विहीरींसाठी असणारी १२ मी खोलीची व दोन सिंचन विहिरीमधील ५०० फूट अंतराची अट सुद्धा रद्द करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचे पात्रता निकष जारी करण्यात आले आहेत जसे अर्जदार अनुसूचित जाती, नवबौद्ध, अनुसुचित जराती प्रवर्गातील असावा. त्यासाठी जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. जमीनधारणा ०.४० हे, ते ६.०० हे. पर्यंत मर्यादित असावी.

शेतकऱ्यांनी वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी महा-डीबीटी पोर्टलचे http://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/Login या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा. सदर योजनेतंर्गत ऑनलाईन अर्ज स्वीकृतीपासून लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची सुविधा पोर्टलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहे. एकत्रित संगणकिय सोडत पद्धतीने लाभार्थी निवडण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

# माथेरान पर्यावरणाची त्रिसदस्यीय समितीकडून पाहणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

पर्यावरण खात्याचे डॉ. थुरू (शास्त्रज्ञ श्रेणी) प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या ऋतुजा भालेराव माथेरान पालिकेच्या अधिकाऱ्यांन सोबत शरलोट लेक, दस्तुरीनाका येथील बोरीचे मैदान व सिम्पसन टँक व इतर परिसराची पाहणी केली. याचा अहवाल व कोणत्या उपाययोजना करता येतील याचा अहवाल राष्ट्रीय हरित लवादाला सादर केला जाणार आहे.

घोड्यांमुळे माथेरानचे पर्यावरण उध्वस्त होत असल्याने यावर उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रीय हरीत लवादाने तज्ञांची समिती गठीत केली.

ॲड. तुषार कुमार यांनी याचिका दाखल करण्याचा हेतू स्पष्ट केल्यावर सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता राष्ट्रीय हरित लवादाचे न्यायाधीश शिओ कुमार सिंग व पर्यावरण तज्ञ डॉ. विजय कुलकर्णी यांनी तीन सदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले या समितीमध्ये केंद्रीय पर्यावरण व वन खात्याचे अधिकारी, प्रदूषण नियंत्रण बोर्डाचे अधिकारी व मुख्याधिकारी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद यांचा समावेश आहे. पुढील सुनावणी २३ डिसेंबर रोजी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने साल २००३ मध्ये माथेरानचे पर्यावरण अबाधित राहावे या उद्देशाने माथेरान व परिसर पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केले माथेरान येथे ब्रिटिश काळापासून वाहनांना बंदी असून घोडा व माणसांनी ओढणारी हात रिक्षा यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी केला जातो माथेरानचा



परिसर हा सात स्क्वेअर किमी इतका छोटा आहे.

सत्तर टक्के परिसर हा घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. प्रवाशी वाहतुकीसाठी ४६० घोडे व मालवाहतुकीसाठी १०० ते १५० घोडे यांचा वापर केला जातो. नगरपालिकेच्या तबेल्याची संख्या फक्त ६६ इतकी आहे घोड्यांची लिद तीन टन इतकी जमा होते. त्यांची विल्हेवाट लावण्याची नगरपालिकेकडे कोणतीही यंत्रणा नाही याचा सर्व परिणाम येथील येथील पर्यावरणावर होत असल्याने यावर उपाययोजना करण्याची मागणी करणारी याचिका सामाजिक कार्यकर्ते सुनिल शिंदे व केतन रमाणे यांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादाकडे केली आहे. २५ ऑक्टोबर रोजी याचिकेवर सुनावणी झाली.

दिल्ली येथील हरित लवादाने हिमाचल प्रदेश येथील कुफ्री येथे ८०० घोड्यांचा वापर पर्यटकांसाठी केला जातो. या घोड्यांमुळे जंगल उध्वस्त होत असल्याने हरित लवादाने तेथील अश्वचलकांचे पुनर्वसन करून घोड्यांची संख्या कमी करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

# नेरळचा कचरा आता घंटागाडी उचलणार

## दोन लहान गाड्या नेरळ ग्रामपंचायतीच्या ताफ्यात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायत शहरीकरणाकडे झुकली असून नागरीकरण झालेल्या सर्व भागातील कचरा उचलता यावा यासाठी दोन नवीन घंटागाडी उपलब्ध झाल्या आहेत. नेरळ ग्रामपंचायतीमधील सर्व गल्लीबोळात घंटागाडी पोहचत नाही. त्यामुळे त्या अरुंद भागातील कचरा उचलता यावा यासाठी स्वच्छ भारत अभियानमधून लहान टेम्पो आणण्यात आले आहेत.

दरम्यान,नेरळग्रामपंचायतीसाठी स्वच्छ भारत अभियानमधून मिळालेल्या घंटागाड्या या इलेक्ट्रिक गाड्या आहेत. त्यामुळे इंधनावरील खर्चदेखील बचत होणार आहे.



नेरळ गावातील प्रत्येक भागात कचरा उचलणे नेरळ ग्रामपंचायत आरोग्य आणि स्वच्छता विभागाला शक्य होत नाही. त्यात गावातील अनेक भाग हे गल्लीबोळासारखे आहेत. हि बाब लक्षात घेऊन नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर यांनी स्वच्छ भारत अभियान कडे अतिरिक्त घंटागाडी देण्यसासाठी प्रस्ताव सादर केले.

स्वच्छ भारत मिशनमधून नेरळ ग्रामपंचायतीसाठी दोन इलेक्ट्रिक लहान टेम्पो कचरा उचलण्यासाठी मंजूर करून दिले.

नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासक सुजित धनगर यांच्या संकल्पनेतून दिवाळीपासून रात्रीच बाजारपेठ भागातील कचरा उचलून घेण्यास सुरुवात केली आहे.

या योजनेमुळे नेरळ गावातील व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण असून आरोग्य विभागाकडून त्या संकल्पनेची अंमलबजावणी होते कि नाही याकडे नेरळ ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी अरुण कारले यांच्याकडून बारीक लक्ष दिले जात असल्याचे दिसून येत आहे.

# कर्जत आरपीआयकडून परभणी घटनेचा निषेध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

परभणी शहरात संविधानाच्या प्रतिकृतीचा झालेला अवमान यांच्या निषेधार्थ कर्जत मध्ये आरपीआयचे निवेदन देण्यात आले.

परभणी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीचा झालेला अवमान करण्यात आला आहे. ही घटना निषेधार्थ असुन संविधानाचा अवमान करणाऱ्या व्यक्तींचा निषेध करण्यासाठी कर्जत आरपीआय यांनी कर्जत येथे प्रांत अधिकारी, तहसीलदार तसेच पोलीस प्रशासक यांना निवेदन देत निषेध केला.

संविधानाचा अवमान करणाऱ्या आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कर्जत तालुका वतीने कर्जत पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, कर्जतचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी अरविंद मोरे, अमर जाधव, राहुल गायकवाड, दिपक भालेराव, किशोर गायकवाड, मनोज गायकवाड, किशोर जाधव, विजय जाधव, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गोतारणे, भारतीय बौद्ध महासभेचे बापु गाडे उपस्थित होते.

## दत्तनामाच्या गजरात दत्तटेकडीला परिक्रमा

# धन्य धन्य हो प्रदक्षिणा...

## नवनाथ आरती मंडळ चौलचा स्तुत्य उपक्रम

**। चौल । प्रतिनिधी ।**

**निघालो घेऊन दत्ताची पालखी... असा मनी असलेला भाव, परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर धन्य धन्य हो प्रदक्षिणा श्री सद्गुरुरायाची.. असं प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसणारं समाधान अन् दिगंबरा दिगंबरा.. श्रीपाद वल्लभ दिगंबराच्या नामघोषात, ढोल-ताशांच्या गजरात चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्तमहारांच्या डोंगराला गुरुवार, दि. १२ डिसेंबर रोजी परिक्रमा घालण्यात आली. टाळ-मृदुंगाचा गजर आणि जोडीला एका सुरात अव्याहतपणे होणारा दत्तनामाचा गजर यामुळे परिक्रमेचा मार्ग दुमदुमून गेला. यावेळी शेकडो दत्तभक्त उपस्थित होते.**



नवनाथ आरती मंडळ चौल यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तमहाराजांच्या प्रतिमेची पालखी परिक्रमा आयोजित करण्यात आली होती. यावर्षीचे पालखी परिक्रमेचे हे चौथे वर्ष होते. या पालखी परिक्रमेत शेकडोंच्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. पर्वतनिवासी दत्तात्रेयांचे स्वयंभू स्थान असलेल्या संपूर्ण भोवाळे डोंगराला यावेळी पायी प्रदक्षिणा घालण्यात आली.

दिगंबरा, दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबराचा अखंड जयघोष, पादुका आणि मूर्तीवर होणारी पुष्पवृष्टी, मंदिरात केलेली विविधरंगी फुलांच्या माळांची आकर्षक सजावट आणि याची देही याची डोळा हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी ठिकठिकाणी मुख्य रस्त्यावर भाविकांची गर्दी जमली होती. यावेळी सुवासिनींकडून दत्तमहाराजांचे औक्षण करण्यात आले. अशा भक्तिमय वातावरणात दत्तमहाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. दुपारी तीन वाजता पालखी मंदिरातून मार्गस्थ झाली. स्वामी समर्थ मंदिरमार्गे, पुढे सराई, सोमेश्वर मंदिर, हनुमानपाडा, गायचोळे अशी मार्गक्रमणा करीत भोवाळे येथून दत्तमंदिरात सायंकाळी सहाच्या सुमारास पालखीचे प्रस्थान झाले. दरम्यान, पहिल्या टप्प्यात सोमेश्वर मंदिरात पालखी विश्रांतीसाठी काही वेळ ठेवण्यात आली. यावेळी चौल येथील दत्तभक्त अमेय राऊत (पूर्णब्रह्म रेस्टॉरंट) यांच्याकडून नाश्ता, नितीन पाटील (बेलोसकर) यांच्याकडून चहाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर पुढे मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी रामचंद्र ठाकूर (बाबू) यांच्याकडून पाणी, थंडपेय तसेच द्वारकानाथ नाईक (कबन अण्णा) यांच्याकडून दत्तभक्तांसाठी थंडपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर पालखी मंदिराकडे मार्गस्थ झाली. जवळपास तीन तासांच्या मार्गक्रमणानंतर पालखीचे दत्तमंदिरात प्रस्थान झाले. महाआरती झाल्यानंतर उपस्थित सर्व भाविकांना प्रसाद देण्यात आला. प्रसादाच्या आस्वादाने भाविक कृतार्थ झाल्याचे पाहावयास मिळाले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी दत्तमंदिराचे गुरव प्रभाकर आगलावे, आशिष वासुदेव, सचिन राऊत, अरुण टेकाळकर, संदीप नागावकर, निकेश घरत, राकेश नाईक, सुनील वैद्य, निलेश माळी आणि नवनाथ आरती मंडळ, चौलच्या सभासदांनी मेहनत घेतली. या पालखी सोहळ्यादरम्यान द्वारकानाथ नाईक, चौल शिवसेना ठाकरे गटाचे विभाग प्रमुख मारुती भगत, चौलमळा गावचे प्रमुख रवींद्र घरत आदी मान्यवरांनी उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेतले. याहीपुढे हा सोहळा दरवर्षी अखंडितपणे सुरु राहणार आहे. दत्तभक्तांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळेच हा सोहळा यशस्वी पार पडला, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

**सुवासिनींकडून औक्षण**

**दत्त पालखीचे ठिकठिकाणी सुवासिनींकडून औक्षण करण्यात आले. यावेळी पालखी मार्गात अनेक ठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. दत्तभक्तांनी पालखी परिक्रमेदरम्यान पालखीवर फुलांची उधळण केली. त्यामुळे संपूर्ण परिसर दत्तमय झाल्याचे चित्र होते.**

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# अदानी-भुताची बाधा

महाभारतात कौरव-पांडवाच्या द्यूतामध्ये वापरलेले फासे जरासंधाच्या हाडांपासून बनवलेले होते. द्यूतात हरत असूनही तो खेळण्याबद्दल भीम युधिष्ठिरावर टीका करू लागला की त्याच्या आवाजाने ते फासे थरथरत आणि दान हमखास पांडवांच्या विरोधात पडे. जरासंधाला भीमाने ज्या रीतीने मारले होते त्यामुळे मेल्यानंतर त्याच्या हाडांमध्येही ती भीती मुरलेली होती. तसेच काहीसे सध्या चालू आहे.  काँग्रेसने अदानीचे नाव घेतले की, मोदीभक्तांची हृदये थरथरू लागतात आणि ते सर्व काँग्रेसवर धावून जातात. सत्तेचे दान आपल्याविरुध्द जाऊ नये म्हणून एकजूट करतात. गेले आठवडाभर भाजपवाल्यांचा संसदेत हंगामा चालू आहे. अमेरिकी गुंतवणूकदार जॉर्ज सोरोस यांच्या नावाचे एक भूत निर्माण करण्यात आले आहे. त्या भुताचा काँग्रेसशी संबंध जोडून आंतरराष्ट्रीय कारस्थान चालू असल्याची आवई उठवण्यात आली आहे. खरी गोष्ट अशी आहे की, खुद्द नरेंद्र मोदींच्या भाजपला अदानी नावाच्या भुताची बाधा झाली आहे. हे भूत भाजपच्या भक्तांना हवे तसे नाचवते आहे. त्याला वाचवण्यासाठी मोदींचे टाळकुटे भक्त कोणत्याही थराला जायला तयार आहेत. या देशातील विमानतळ, बंदर, वीज प्रकल्प, खाणी, धारावीसारखे प्रकल्प यांचा नैवेद्य या भुताला देऊन झाला आहे. तरीही त्याची भूक भागत नाही. त्यामुळे त्याला सतत काही ना काही खायला द्यावे लागते. शिवाय, या भुतावर कोणी काही उपाय करू नये म्हणून त्याच्या संरक्षणाची जबाबदारीही या भक्तांवरच आहे. अदानीच्या भानगडींविरोधात गेल्या दोन वर्षात विविध संस्था वा माध्यमांनी अहवाल प्रसिध्द केले आहेत. पण प्राण गेला तरी अदानीची चौकशी होऊ देणार नाही असा निश्चय मोदी सरकारने केला आहे. अलिकडेच अमेरिकी सरकारी यंत्रणेने अमेरिकी न्यायालयात अदानीवर खटला भरला. सौरवीजेच्या पुरवठ्याची सरकारी कंत्राटे मिळवण्यासाठी अदानीने दोन हजार कोटी रुपयांची लाच दिली असा गंभीर आरोप अमेरिकी यंत्रणांनी केला आहे.

## बादरायण संबंध

एरवीच्या काळात भारतातही याची सीबीआय किंवा अन्य यंत्रणांमार्फत चौकशी सुरू झाली असती. यापूर्वी बोफोर्ससारख्या प्रकरणात ठोस पुरावा नसताना आणि प्रकरण काँग्रेसविरुध्दच असूनही राजीव गांधी यांनी चौकशी आयोग नेमला होता. संयुक्त संसदीय समितीला मान्यता दिली होती. आता इथे अमेरिकी यंत्रणेने खटला दाखल करूनही मोदी सरकार याबाबत संसदेत याची साधी चर्चादेखील होऊ देण्यास तयार नाही. संयुक्त संसदीय चौकशी हा तर फार पुढचा विषय झाला. काँग्रेसने पहिला आठवडाभर अदानी प्रकरणावरून गदारोळ केला. नंतर त्या पक्षाने कामकाजात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या मार्गाने अदानी किंवा उत्तर प्रदेशातील संभळ मशिदीचे सर्वेक्षण असे प्रश्न समोर येणार हे नक्की झाले. त्यासरशी भाजपवाल्यांनी सोरोसचा मुद्दा उपस्थित करून गोंधळ माजवायला सुरूवात केली. सोरोस व सोनिया गांधी कोणत्या तरी एका संस्थेशी संबंधित आहेत असा बादरायण संबंध जोडून सोनियांचे नाव यात आणण्यात आले. सोरोसशी संबंधित एक संस्था, भारतात संसदेच्या अधिवेशनाच्या आधी वेळ साधून मोदीविरोधी अहवाल प्रसृत करते व काँग्रेस त्यांचा आधार घेऊन संसदेत गोंधळ घालते असे भाजपचे म्हणणे आहे. हा सर्व सोरोसच्या कारस्थानाचा भाग असून त्याला भारताची अर्थव्यवस्था कम कुवत करायची आहे असा यातला पुढचा युक्तिवाद आहे. पण एखाद्या शाळकरी पोरालाही यातील मूर्खपणा कळून येईल. संसदेत गदारोळ झाल्याने देशाची अर्थव्यवस्था कमजोर होते हा दावाच भन्नाट म्हणावा लागेल. शिवाय, तसे होत असेल तर साधी गोष्ट अशी आहे की, संसदेत असा गदारोळ होऊ न देणे. ही जबाबदारी सरकार म्हणून भाजपचीच आहे. अदानीची चौकशी व्हावी व या प्रकरणावर चर्चा व्हावी अशी काँग्रेसची मागणी आहे. अमेरिकी यंत्रणांनी अदानीवर खटला भरल्याने देशाची अब्रू गेली आहे. शिवाय, सरकारी अधिकाऱ्यांना तब्बल दोन हजार कोटी रुपये लाच देण्याचा अत्यंत गंभीर आरोप यात आहे.

## शाह यांचे पोलिस झोपले काय?

खरे तर मोदी सरकारने स्वतःहून याची दखल घेऊन तात्काळ चौकशी केली असती तर पुढच्या काँग्रेसच्या गदारोळाचा वगैरे प्रश्नच आला नसता. पण एक खून पचवण्यासाठी आणखी खून करावे लागतात असे म्हणतात. तसे भाजपचे चालू आहे. आपण चौकशी टाळतो आहोत हे दडवण्यासाठी सोरोसच्या नावाने बोंब ठोकून काँग्रेसच्या चौकशीची मागणी तो करीत आहे. कहर म्हणजे त्यासाठी फ्रान्सच्या मिडियापार्ट नावाच्या एका पत्रकारी संस्थेच्या अहवालाचा आधार घेतला जात आहे. वास्तविक गेली दहा वर्षे सरकार भाजपचे आहे. अमित शाह नावाचे लोहपुरुष गृहमंत्री आहेत. सोरोस व काँग्रेस यांचे कारस्थान चालू असेल तर शाह आणि त्यांचे पोलिस काय झोपा काढत आहेत काय असा सवाल करायला हवा. दुसरे असे की, याच मिडियापार्टने जेव्हा राफेल घोटाळ्याचा पर्दाफाश केला होता तेव्हा भाजपने त्याचा अहवाल नाकारला होता. तिसरे म्हणजे, भाजपच्या या गदारोळानंतर खुद्द मिडियापार्टने आपल्या अहवालाचा विपर्यास करून भाजप राजकारण करीत आहे अशी टीका केली आहे. अमेरिकी सरकारनेही मोदींबाबत नापसंती व्यक्त केली आहे. सर्वात शेवटी, सोरोस प्रकरणाची कोणत्याही यंत्रणेमार्फत चौकशी केली तरी चालेल असे खुद्द काँग्रेसनेच म्हटले आहे. तरीही संसदेत गदारोळ चालू आहे. याचाच अर्थ अदानी नावाच्या भुताला पाठीशी घालण्यासाठी भाजपचे हे उपद्व्याप चालू आहेत. स्वतंत्र भारताच्या इतिहासात सत्तारुढ पक्षाने कधीही असा प्रकार केलेला नाही. गंमत म्हणजे, अदानी प्रकरणात काँग्रेसच्या सदस्यांना संसदेत अजिबात बोलू दिले जात नाही वा त्यांचे बोलणे रेकॉर्डवरून काढून टाकले जाते. याउलट सोरोसबाबतचे बिनबुडाचे आरोप करण्यासाठी भाजपच्या सदस्यांना दोन्ही सभागृहांमध्ये वाटेल तितका काळ बोलू दिले जाते हे गेल्या आठवड्यात वारंवार दिसले. दुर्दैवाने आपल्या देशातला सर्व मिडिया भाजपला विकला गेलेला आहे. त्यामुळे लोकांपुढे काँग्रेसची व खरी बाजू जाणेच थांबले आहे.

विचार

# जगज्जेता!

***वयाच्या सातव्या वर्षी त्याने एक स्वप्न पाहिले... बुद्धिबळाचा जगज्जेता होण्याचे. आणि आज वयाच्या अठराव्या वर्षी त्याने ते स्वप्न साकार करून दाखवले. फक्त साकारच केले नाही तर तो बुद्धिबळाच्या इतिहासातला सर्वात तरुण जगज्जेता ठरला. भारताच्या डोमाराजू गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून बुद्धिबळाच्या पटावरचा एक नवा अध्याय लिहिला.***

**श्रीशा वागळे**

भारत हा बुद्धिबळाचा जन्मदाता आणि याच भारतभूमीच्या सुपुत्राने बुद्धिबळाचा सर्वात युवा जगज्जेता होण्याचा मान पटकावणे ही तमाम भारतवासीयांसाठी अभिमानास्पद बाब. भारताचे बुद्धिबळातले आशास्थान असणाऱ्या डोमाराजू गुकेशने ही अलौकिक अशी कामगिरी करून दाखवली आहे. सिंगापूर येथे पार पडलेल्या जागतिक बुद्धिबळ लढतीत गुकेशने गतविजेत्या डिंग लिरेनवर १४ व्या डावात ५८ चालींमध्ये विजय मिळवला. ही लढत ७.५-६.५ अशी जिंकत त्याने जगज्जेतेपद पटकावले. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी त्याने ही कामगिरी करून दाखवली. सिंगापूरच्या भूमीवर ही जगज्जेतेपदाची लढत सुरू झाल्यानंतर साऱ्या बुद्धिबळजगताचे लक्ष त्याकडे लागून राहिले होते. डिंग लिरेन आपले जगज्जेतेपद राखणार  का युवा डी. गुकेश त्याची मक्तेदारी मोडून काढणार, याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अखेर गुकेशने संयमी खेळाचे दर्शन घडवत बाजी मारली. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतरचा दुसराच भारतीय जगज्जेता. त्यामुळे त्याच्या या विजयाला एक वेगळेच कोंदण आहे. २५ नोव्हेंबरला जगज्जेतेपदाची ही लढत सुरू झाली. लिरेन आणि गुकेशमध्ये तब्बल सतरा दिवस जगज्जेतेपदासाठीचा लढा सुरू होता. गुकेशने या काळात संयम, विजिगिषु वृत्ती, एकाग्रता यांचे प्रभावी दर्शन घडवले. आपले चित्त कधीही विचलित होऊ दिले नाही. पहिल्या डावात पराभूत झाल्यानंतरही त्याने आत्मविश्वास ढळू दिला नाही.

तेराव्या डावात गुकेश आणि लिरेन यांनी ६.५-६.५ गुण मिळवत बरोबरी गाठली होती. त्यानंतर चौदाव्या डावात लिरेनने केलेल्या चुकीचा लाभ उठवत गुकेशने जगज्जेतेपदाचे स्वप्न साकार केले. या संपूर्ण लढतीत गुकेशने आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. त्याने कोणतेही दडपण घेतले नाही. दुसरीकडे लिरेन टायब्रेकरवर अतिविसंबून राहिल्याचे दिसून आले. त्याची मानसिक तंदुरुस्तीही काहीशी ढासळलेली होती. त्याने या लढतीत बचावात्मक पवित्र्यावर अधिक भर दिला होता. मात्र गुकेशकडे लिरेनच्या प्रत्येक चालीची उत्तरे होती. ती त्याने दिली आणि लिरेनला चेकमेट केले. विजय समोर दिसू लागताच गुकेशच्या डोळ्यात आनंदाश्रू तराळले. विजेतेपदानंतर त्याने वडिलांना मिठी मारून अश्रूंना वाट मोकळी करून दिली. गुकेशने जगज्जेतेपदाचे स्वप्न पाहिले होते. मात्र त्याच्यासह संपूर्ण भारत हे स्वप्न जगला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. बुद्धिबळ म्हटले की आपल्यासमोर विश्वनाथन आनंदचे नाव येते. आनंदने भारतीय बुद्धिबळाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. २०१२ मध्ये आनंदने शेवटचे जगज्जेतेपद पटकावले. त्यानंतर तब्बल बारा वर्षांनी एका भारतीयाने हे जगज्जेतेपद पटकावले आहे. विश्वनाथन आनंदनंतर कोण याचे उत्तर गुकेशने आपल्या प्रभावी खेळाने देऊन टाकले आहे. येत्या काळात गुकेश विश्वनाथन आनंदचा वारसा चालवणार आहे. भारताच्या शिरपेचात अनेक तुरे खोवले जाणार आहेत.



गुकेशने आज जगज्जेतेपद पटकावले असले तरी त्याचा इथपर्यंतचा प्रवास संघर्षपूर्ण राहिला आहे. ७ मे २००६ रोजी चेन्नईमध्ये जन्मलेल्या गुकेशने वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळ खेळायला सुरूवात केली. सुरूवातीच्या काळात त्याने भास्कर नेगैय्या यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्याला खुद्द विश्वनाथन आनंदचे मार्गदर्शन लाभले. गुकेशचे वडील डॉक्टर तर आई मायक्रोबायोलॉजिस्ट, पण गुकेशचे मन बुद्धिबळातच रमले. आई-वडिलांनीची गुकेशच्या गुणवत्तेला प्रोत्साहन दिले. मुलाने बुद्धिबळात नाव कमवावे यासाठी त्यांनीही अथक प्रयत्न केले. घरात शैक्षणिक वातावरण असूनही आई-वडिलांनी गुकेशला शिक्षणातून सूट दिली. चौथीनंतर तो नियमितपणे शाळेत जात नसे. त्याने आपले सगळे लक्ष फक्त आणि फक्त बुद्धिबळावर केंद्रित केले. बुद्धिबळ हाच त्याचा ध्यास आणि श्वास बनला.  गुकेश बुद्धिबळाच्या पटलावरील एक एक चाली शिकत गेला. व्यावसायिक बुद्धिबळ खेळायला लागल्यानंतर गुकेशने शाळेची वार्षिक परीक्षाच दिली नाही. मात्र बुद्धिबळाची परीक्षा तो उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत राहिला. मुलाला बुद्धिबळ स्पर्धांसाठी देश-विदेशात नेण्याची जबाबदारी वडिलांनी घेतली. त्यामुळे त्यांना काही काळ दवाखाना बंद करावा लागला.तेव्हा घरखर्च चालवण्याची जबाबदारी आईने पेलली. मात्र त्यांनीही हार मानली नाही. सुरूवातीच्या काळात प्रायोजकांअभावी गुकेशला परदेश दौऱ्यांदरम्यान आर्थिक चणचणीचा सामना करावा लागला. परदेशातल्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी त्याच्या आई-वडिलांना अनेकदा कर्जही घ्यावे लागले. मात्र आता जगज्जेतेपद पटकावत त्याने परिश्रमाचे आणि आई-वडिलांच्या त्यागाचे चीज केले आहे.

युवा गुकेशने बुद्धिबळजगतात अनेक कारनामे केले आहेत. लहान वयापासूनच तो आपल्या गुणवत्तेची, प्रतिभेची चुणूक दाखवत आला आहे. २०१५ मध्ये वयाच्या नवव्या वर्षी त्याने नऊ वर्षांखालील मुलांची आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा जिंकली. २०१७ मध्ये वयाच्या अकराव्या वर्षी तो आंतरराष्ट्रीय मास्टर बनला. २०१८ मध्ये बारा वर्षांखालील विभागात त्याने जागतिक युवा अजिंक्यपद स्पर्धा जिंकली. २०१९ मध्ये त्याने ग्रँडमास्टर किताब पटकावला. यावेळी त्याचे वय होते फक्त १२ वर्षे, ७ महिने आणि १७ दिवस. तो बुद्धिबळ जगतातला दुसरा सर्वात युवा ग्रँडमास्टर बनला. एप्रिल २०२४ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी त्याने फिडे कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. अशी कामगिरी करणारा तो सर्वात युवा बुद्धिबळपटू ठरला. गुकेश सातत्याने बुद्धिबळात एक एक पायरी चढत होता. अनेक विक्रम रचत होता. वरिष्ठ पातळीवरही गुकेशने स्वत:ला सिद्ध केले. २०२१ मध्ये त्याने ज्युलियन बेयर चॅलेंजर्स बुद्धिबळ गेलफँड चॅलेंज जिंकले. यात त्याने १९ पैकी १४ गुण मिळवले.

२०२२ मध्ये एमचेस रॅपिड स्पर्धेत त्याने मॅग्नस कार्लसनला पराभूत केले होते. कार्लसन जगज्जेता झाल्यानंतर त्याला पराभूत करणारा गुकेश हा सर्वात कमी वयाचा खेळाडू होता. २०२३ मध्ये बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय गुणतालिकेत २७५० गुण मिळवणारा गुकेश हा सर्वात युवा खेळाडू ठरला होता. याच वर्षी त्याने भारतीय बुद्धिबळपटूंच्या पहिल्या दहा खेळाडूंच्या यादीत विश्वनाथन आनंदला मागे टाकले होते. ३७ वर्षांमध्ये पहिल्यांदाच विश्वनाथन आनंद पहिल्या दहा खेळाडूंच्या यादीतून बाहेर गेला होता. गुकेशने यंदा चमकदार कामगिरी केली. त्याने फिडे कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा तर जिंकलीच शिवाय सप्टेंबर महिन्यात त्याच्या सहभागात हंगेरीत झालेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकले होते. त्यात गुकेशने वैयक्तिक सुवर्णपदक जिंकत जगज्जेतेपदाची आपली दावेदारी अधिक बळकट केली होती.  ऑलिम्पियाडमधल्या दहापैकी आठ साम न्यांमध्ये गुकेशने विजय मिळवला होता तर त्याचे दोन सामने बरोबरीत सुटले होते. त्याच्या अनेक चालींना प्रतिस्पर्ध्याकडे उत्तर नव्हते. या युवा बुद्धिबळपटूने स्पर्धेच्या दहाव्या फेरीमध्ये अमेरिकेच्या तिसऱ्या म ानांकित फॅबिआनो कारुआनाचा पराभव केला होता. या कामगिरीमुळे गुकेशच्या जगज्जेतेपद मिळवण्याच्या आशा पल्लवित झाल्या होत्या.    गुकेश जगज्जेता होणार याची खात्री त्याच्या चाहत्यांना वाटू लागली होती. गुकेशनेही चाहत्यांचा विश्वास ढळू दिला नाही आणि जगज्जेतेपद पटकावून आपण 'लंबी रेस का घोडा' असल्याचे दाखवून दिले. विश्वनाथन आनंदने पाच वेळा बुद्धिबळाचे जगज्जेतेपद पटकावले आहे. डी. गुकेशचे जगज्जेतेपद ही फक्त एक सुरूवात आहे.

गुकेश वयाच्या अठराव्या वर्षी बुद्धिबळाचा अठरावा जगज्जेता ठरला आहे. हा खरे तर एक योगायोगच म्हणावा लागेल. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी जगज्जेतेपद पटकावून गुकेशने गॅरी कास्पोरोव्हचा विक्रम मोडला आहे. कास्पारोव्हने १९८५ मध्ये वयाच्या बाविसाव्या वर्षी हे यश मिळवले होते. गुकेश त्याच्यापेक्षा चार वर्षांनी लहान आहे. गॅरी कास्पारोव्हचा विक्रम कोणी मोडू शकेल, असे कोणाला वाटले नसेल. मात्र भारताच्या गुकेशने तो मोडला. वयाच्या बावीसाव्या वर्षापर्यंत तो अजून बरेच काही साध्य करू शकतो. गुकेशला या वयापर्यंत अजून दोन जगज्जेतेपदाच्या लढती खेळायला मिळण्याची शक्यता आहे.

गेली दहा ते बारा वर्षे नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने बुद्धिबळ जगतावर अधिराज्य गाजवले. आता गुकेशची पाळी आहे. त्याने कमी वयात मोठे यश मिळवले आहे. त्याच्याकडे अजून बरीच वर्षे आहेत. गुकेश दृढनिश्चयी आहे. त्यामुळे येत्या काळात तो बुद्धिबळाचा अनभिषिक्त सम्राट ठरणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गुकेशने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

विशेष

# हा अनुभव तुम्हालाही येवू शकतो,तेव्हा सावध रहा

**मानसी मानसी**

माझे इन्स्टाग्राम अकाऊंट हॅक झाले. काही कळायच्या आतच पूर्ण  मी गमावला. सुट्टीचा दिवस आणि मी बाहेर असल्याने माझ्या परस्पर कुणीतरी स्टोरी अपलोड केली होती, ज्यात मला, मी ३० हजार बिटकॉइन मध्ये गुंतवल्यामुळे कमी वेळात ३ लाख रुपये मिळाल्याचे सांगण्यात आले होते. माझा फोटो आणि त्यावर ही माहिती,      आणि नजरेला पाहताक्षणी खरं वाटेल, अशी पोस्ट.

मला माझ्या भावाने तात्काळ फोन करून कळवले, की ताई तुझं इन्स्टाग्राम अकाउंट हॅक झालंय,  पडतायत. ताबडतोब, पासवर्ड बदल किंवा अकाउंट डिलिट कर. मी क्षणाचाही उशीर न करता लगेचच पासवर्ड बदलला आणि नवी स्टोरी अपलोड केली. की, हे सगळं खोटं आहे असं सांगणारी. पण ती स्टोरी अपलोड झालीच नाही आणि मग फ्लॅश झाला की, ' . त्यानंतर अनेक प्रकारे मी अकाउंट मध्ये लॉगिन करण्याचा प्रयत्न केला. सगळे पासवर्ड बदलले. ला केलं.      केलं. सगळ्यांना कळवलं, की ही मी नाही. माझं अकाउंट  झालं वगैरे वगैरे.

रात्र अस्वस्थतेत गेली. खूप साधी सिंपल प्रोफाइल होती माझी. पण एक  असते आपली. छोटे-मोठे क्षण, सुचलेली कॅप्शन्स आणि मित्र-मैत्रिणींच्या भन्नाट , . थोडक्यात, मजा असते. जणू एक   असतं आपलं. हे सगळं आता गेलं एका क्षणात या जाणीवेने मी अस्वस्थ होतेच. मात्र, दुसरी एक भीती वाटायला लागली, की माझे फोटो वापरून काही गैरप्रकार झाले तर? सकाळी नको ते समोर आलं तर?? असेच प्रश्न.

सकाळ झाली ती एका नव्या माहितीने. माझ्या मामेबहिणीने रात्री मी पैसे मागितलेत म्हणून १० हजार रुपये पाठवले. त्या भामट्याने तिला इतकं छान गंडवलं आणि ती फसली की माझी दाणादाण उडाली. माझ्या कल्पनेपलीकडचं होतं हे सगळं. खूप बातम्या, किस्से, घटना ऐकतो-वाचतो-पाहतो आपण. त्यामुळे कोणत्याही लिंकवर क्लिक नाही करत आपण, नीटसा तपास केल्याशिवाय. पण, माझ्या बहिणीचा माझ्यावर इतका विश्वास म्हणू की प्रेम की काय म्हणू, मला कळत नाही. तिने क्षणाचाही विलंब न करता पैसे पाठवले. आणि फसली! (हा शुद्ध मूर्खपणा आहे, या मूर्खपणाचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही.)

या घटनेने मला मात्र याची जाणीव झाली, की हे प्रकरण केवळ अकाउंट रिपोर्ट मारून, सगळ्यांना मेसेज करुन, फेसबुक वर पोस्ट लिहून, व्हॉट्स ऍप ला स्टेटस अपडेट करून निभावणार नाही. आपल्याला सायबर सिक्योरिटी सेल ची मदत घेतली पाहिजे. किमान, तक्रार नोंदवली गेली पाहिजे.

मी तेच केलं. १९३० या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवली. संबंधित अधिकाऱ्यांनी मला जवळच्या पोलिसस्टेशन ला जाऊन तक्रार नोंदवायला सांगितली. मी त्याप्रमाणे सर्व पूर्तता केली आणि आज दिवसभर पुण्याच्या सायबर सिक्योरिटी सेल च्या अधिकाऱ्यांनी माझ्या तक्रारीची दखल घेत कारवाई सुरू केली.

यातून ठळक एकच गोष्ट मला समजली ती अशी, की  होणार नाही. जमेल तसे परिचितांना, मित्रयादीतल्या लोकांना, सगळ्या  ना मेसेज, ईमेल, पोस्ट, स्टेटस, स्टोरी टाकून किंवा प्रत्यक्ष फोन करुन कळवा, की असे असे झाले आहे. किमान ४० लोकांनी माझे ते अकाउंट  करणे गरजेचे आहे, तेव्हाच ते ब्लॉक होईल, असेही सांगितले. माझा फोटो वापरून माझ्या नावे पैसे इन्वेस्ट करायला सांगणाऱ्या कोणत्याही प्रोफाइलवर विश्वास ठेवू नका. हेच वारंवार सांगा, हे पोलिसांनी सांगितले आहे.

पोलिसांच्या मते, माझी कोणतीही आर्थिक फसवणूक झाली नसल्यामुळे गुन्हा नोंद होऊ शकत नाही. हे जे कुणी फ्रॉडस्टर्स आहेत ते नायजेरियन असल्याचे तपासाअंती स्पष्ट झाले.

मी कोणत्या लिंक वर क्लिक् केल्याने हे घडले???

तर त्याचे उत्तर असे- माझ्या जवळच्या मैत्रिणीच्या नावे तिच्या अकाउंट वरून, तिच्या फोटोसह इन्स्टाग्राम मॅसेंजर मध्ये एक मेसेज आला. ज्यात लिहिलं होतं, की तिने  मध्ये भाग घेतलाय. मला प्लीज वोट करशील का? अशी विचारणा करत एक लिंक शेअर केली होती. मी त्या मेसेजला ''हो, जरूर करेन.'' असा रिप्लाय केला आणि थोड्यावेळाने करते असे कळवले. मी माझी दिवसभरातली कामे आटोपून रात्री निवांतवेळी तिला वोट करण्यासाठी ती लिंक ओपन केली. तिथे मला इन्स्टाग्राम लॉगिन करा असा मेसेज आला.

मुळात मी इन्स्टाग्राम अप्लिकेशन मध्येच हे सगळे करत होते. तरीही, पुन्हा वेगळं लॉगिन का मागत आहेत? हे जरा विचित्र वाटले. तिथेच माझी विकेट गेली होती. पुढे तिथे काहीही होईना. म्हणून मी तो प्रयत्न सोडला आणि तिला कळवले, '? इतके बोलून मी तिथेच थांबले. तिचा काहीही रिप्लाय आला नाही. दुसऱ्या दिवशीही नाही. तेव्हा मला थोडं विचित्र वाटलं. मग मला फेसबुकला ती  ला फिरायला गेल्याची स्टोरी दिसली. मनात आलं, अरेच्चा! ही तर इकडे फिरतेय. मग तो मेसेज??? तरीही मी म्हटलं, जाऊदे. झालं असेल तिचं काम. मी विसरून गेले. आणि ७ तारखेला संध्याकाळी माझे इन्स्टाग्राम अकाउंट हॅक झाले. हे सगळे कसे घडले, का घडले, त्याचे कारण त्यामध्ये दडलेले होते. आज सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी मला हे उलगडून सांगितले. मोठा धडा मिळाला!

मी माझ्या ''त्या'' मैत्रिणीला थेट फोन करुन शहानिशा केली असता, तिचे एक   सध्या अशा गोष्टी करत असल्याचे कळले. तिला याची माहिती असूनसुद्धा तिने याबाबत काहीही एक्शन घेतली नाही. दुर्लक्ष केले. या  चा माझ्यासह आणखी काही जणांना फटका बसला आहे. कधीकधी आपण मैत्रीसाठी मागचा-पुढचा विचार न करता, सरसावून पुढे जातो. असे करणे नेहमीच योग्य नसते. थोडं थांबून- उसंत घेऊन प्रतिसाद द्यावा, मदत करावी - हा नवा धडा मला मिळाला.

सायबर गुन्ह्यांची तीव्रता वाढते आहे. लोकांमध्ये प्रचंड अनास्था आहे कारण सिस्टम मध्येच अनास्था आहे. एखादा प्रसंग ओढवल्यानंतर जेव्हा तुम्ही यंत्रणेकडे मदत मागायला जाता, तेव्हा आपण किस झाड की पत्ती आहोत!  अशा अतिसामान्य असण्याची जाणीव ग्रासून भयंकर वैफल्य येते. इथेच, टिकून खेळायचे आहे. हरतऱ्हेने प्रयत्नांची पराकाष्ठा करायची आहे. तोंड दुखेल, मन विटेल इतक्या वेळा सगळ्यांना हे सांगायचे आहे. कारण, आपल्यासोबत जे घडले ते इतरांसोबत घडू नये, इतका साधाच विचार मनात ठेवण्याची गरज आहे.

बाकी, मग ज्याचा त्याचा प्रश्न. आपण सगळेच प्रश्न सोडवू शकत नसतो. किमान, व्यवस्थेवर विश्वास दाखवून कागदाला शाई लावून ''हे चुकीचे घडले आहे.'' हे सांगण्याची जबाबदारी मात्र आपलीच आहे!

भारतात बेरोजगारी प्रचंड वाढते आहे. लोकांना झटपट पैसे मिळवायचे आहेत. सारासार विवेक लोप पावत चालला आहे. पैशांच्या बाबतीत तर प्रकर्षाने! तरुण मुले 'ट्रेडिंग' च्या नावाखाली आर्थिक जोखीम पत्करत आहेत. यात मोठी-फामिंदी माणसेही आघाडीवर आहेत. कारण, वाढत्या महागाईमुळे आणि रोजगाराची साधने तुटपुंजी असल्यामुळे एक विचित्र मजबुरी सर्वांच्या जगण्याला ग्रासून उरली आहे. त्यात चंगळवादी जीवनशैली अनेकांची आहे. काटकसर करावी, बचत करावी, नवी कौशल्ये आत्मसात करावीत, तरुणांनी अंगमेहनतीची कामे करावीत, बौद्धिकता जोपासावी हे तत्त्वज्ञान जुने झालेले दिसते, जेव्हा आपण कुणाचे समुपदेशन करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपण त्यांच्यालेखी   आहोत, हे समजते. पण, मला माझे ओल्ड स्कूलत्व आवडते. ते मला विपरित परिस्थितीत न डगमगण्याचे बळ देते. अडचणींचा सामना करायला शिकवते. प्रश्नांच्या गर्तेत अडकून न बसता, विमनस्क न होता, उत्तरे शोधण्याची धडपड करत राहिलं पाहिजे हे सांगते.

**(साभार)**

# मराठी साहित्यिक दिनविशेष

**१४ डिसेंबर**

**१८८२ :-** रेव्ह. डॉ. सॅम्युएल बेकने फेअरबॅक यांचा जन्म. महाराष्ट्रात येऊन मराठी शिकून काही इंग्रजी गीते मराठीत उतरवली तसेच स्वतंत्र अभंग रचना, गणितावर पुस्तके आणि बायबलच्या भाषा समितीवरही त्यांनी काम केले. अमेरिकन मराठी मिशनच्या मुद्रणालयाची जबाबदारी त्यांनी घेतली. ईश्वर भजनाची गीते' हा काव्यसंग्रही त्यांचा प्रसिध्द झाला आहे. 'ज्ञानोदय' ह्या नियतकालिकेचे संपादक असताना विविध विषयांवर अनेक विचार प्रवर्तक लेख त्यांनी लिहिलेत. त्यांच्या नावावर वीस, पंचवीस पुस्तके जमा आहेत. **१८९२ :-** कवी, कथाकार, नाटककार विट्ठल कृष्ण नेरुरकर यांचा जन्म. 'म ुलींची शाळा' ही एकांकिका, नागरिकता वाचनमाला पुस्तक १,२ तसेच 'साधना व नवा नमुना' या कादंबऱ्या. 'प्रतिबिंबे फोटोचं लग्न नि इतर लघुकथा हे कथासंग्रह, तसेच 'मधली सुट्टी', 'माणूस आणि पशू', 'शिलाचे मोल' ही लहान मुलांसाठी पुस्तके त्यांनी लिहिली. **१९०५ :-** मराठी साहित्यात लघु निबंधकार, कादंबरीकार समीक्षक म्हणून ठसा उमटवणारे विश्वनाथ पांडुरंग दांडेकर यांचा जन्म. आनंदी वृत्ती, जीवनाकडे उदार पाहणारी जीवनदृष्टी, सौंदर्याचे आकर्षण, विनोद, कल्पकता यांचे मिश्रण त्यांच्या लघु निबंधात आढळते. याची प्रचिती फेरफटका, टेकडीवरून, एक पाऊल पुढे, काळ खेळतो आहे या लघु निबंध संग्रहावरून येते. त्यांच्या कादंबऱ्यातन पारंपारिक नीती मल्यांना त्यांनी विरोध केला आहे. याखेरीज 'मराठी नाट्यसृष्टी : पौराणिक नाटके आणि मराठी नाट्यसृष्टी : सामाजिक नाटके या ग्रंथातून त्यांनी ४०० हून अधिक नाटकांचा त्रोटक परिचय करून दिलेला आहे. सयाजीराव गायकवाड यांच्या चरित्रासह केळकर यांची सहा नाटके हे समीक्षात्मक तर मराठी साहित्याची रूपरेषा हा त्यांचा साहित्येतिहास संक्षेपाने मांडणारा ग्रंथ प्रसिद्ध. **१९१८ :-** जागतिक कीर्तीचे योगाचार्य आणि या विषयावरील लेखक बी. के. एस अय्यंगार यांचा जन्म. 'आरोग्य योग', 'योग सर्वांसाठी', 'योग-एक कल्पतरु' इ. पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३८ :-** लेखक प्रभाकर वामनराव ढगे यांचा जन्म. यांनी 'आरोग्य ज्ञान सुम ने', 'प्रतिभेचे लेणे' ही पुस्तके लिहिलीत. १९४३ :- लेखक विजय जोशी यांचा जन्म. ह्यांनी 'त्रिकोणी प्रेमाची पॉलिसी' हे विनोदी फार्सिकल नाटक लिहिले. **१९४९ :-** लेखिका डॉ. अनुपमा निरंजन उजगरे यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित ग्रंथसंपदेत 'जाण' हा कथासंग्रह, 'तुम्हाला काय वाटतं?' हा वैचारिक लेखसंग्रह, 'सांगी', 'पश्चात' ही काव्य, 'चांदणचुरा' हे ललित याशिवाय विष्णूशास्त्री चिपळूणकर, पं. रमाबाई ह्यांच्या चरित्रासह अनुवादित काव्य, कादंबरी शिवाय विपुल प्रमाणात संपादित साहित्य त्यांच्या नाव-ावर आढळते. **१९५६ : -** चरित्र लेखक हेमराज श्रावण चेटुले यांचा जन्म. यांनी 'संत रवाने महाराजांचे चरित्र' लिहिले आहे. **१९७७ :-** 'गीतरामायणकार' या उपाधीने साऱ्या महाराष्ट्राला परिचित असणारे ख्यातनाम गीतकार, पटकथालेखक, कादंबरीकार, आत्मचरित्र लेखक कवी गजानन दिगंबर माडगूळकर यांचे निधन. 'सुगंधी वीणा' हा गीतसंग्रह, 'जोगिया' हे काव्य आणि रामायणावर आधारित गीतांची मालिका 'गीतराम ायण' सह 'कृष्णाची करंगळी ते चंदनी उदबत्ती' मिळून १० कथासंग्रह, 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या.'मंतरलेले दिवस', 'वाटेवरल्या सावल्या', 'तीळ-तांदूळ' हे आत्मकथनात्मक लेखन, 'युध्दाच्या सावलया' हे नाटक, अशी त्यांनी निर्मिती चित्रपट क्षेत्राबाहेरही बहरली.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीपैकी विद्यमान मालक श्री. भगवान सीताराम वर्तक रा.मु. पो. चौल ता.अलिबाग, जि रायगड यांच्या मालकीच्या मिळकतीमधील खालील नमूद केलेली मिळकत हि विद्यमान मालक याच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | ८७१/२ | १-३०-४० <br> पो.ख.०-६८-२० <br> एकूण १-९८-६० | ४१.६८ |

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीमधील विद्यमान मालक यांचा मालकीचे ०-५०-४० आर.,पो.ख.०-२३-९० हे आर. या मिळकतीपैकी ०-३४-१० हे आर. पॉ., मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १४/१२/२०२४

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्या द्वारे खालील कामांसाठी खुल्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**अ.क्र.: 1. कामाचे नाव**: एसएसई/विलवडे विभागांतर्गत मुख्य पुलांमध्ये आणि बोगद्यात स्लीपर बदलण्याचे काम. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-75ए (दुसरा कॉल), दिनांक: 12.12.2024**. **अंदाजित खर्च**: रु. 1,39,93,998/-. **ईरठे**: रु. 2,20,000/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.01.2025, 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र.: 2. कामाचे नाव**: एसएसई/माणगाव विभागांतर्गत पाटली नदी पुल (ओपन वेब गर्डर) ओडब्ल्यूजी साठी साइड फूटपाथची तरतुद. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-87, दिनांक: 12.12.2024**. **अंदाजित खर्च**: रु. 6,61,757/-. **ईरठे**: रु. 13,200/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.01.2025, 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र.: 3. कामाचे नाव**: माणगाव - सापे स्थानकादरम्यान ट्रॅकची उथळ स्क्रीनिंग आणि कटिंग साइड ड्रेनचे खोदकाम. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-89, दिनांक: 12.12.2024**. **अंदाजित खर्च**: रु. 33,43,599/-. **ईरठे**: रु. 66,900/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.01.2025, 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र.: 4. कामाचे नाव**: एसईएन/चिपळूण विभागांतर्गत ग्रूव्हड स्लीपरच्या नॉचचे भरणे. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-88, दिनांक: 12.12.2024**. **अंदाजित खर्च**: रु. 6,84,000/-. **ईरठे**: रु. 13,700/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.01.2025, 15:00 वाजेपर्यंत.

**अ.क्र.: 5. कामाचे नाव**: वरिष्ठ आरईएन/रत्नागिरी विभागांतर्गत सीआरओ लोकेशनवर काटेरी तारांची कुंपण पुरवणे. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2024-09ए (दुसरा कॉल), दिनांक: 12.12.2024**. अंदाजित खर्च: रु. 16,83,354/-. **ईरठे**: रु. 33,700/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.01.2025, 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा (संकेतस्थळ : **https://www.ireps.gov.in**)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रविकिरण काशिनाथ नाईक व सौ.रश्मी रविकिरण नाईक यांच्याकडून सदर मिळकत कायम विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे अलिबाग, ता. अलिबाग सिटी सर्व्हे नंबर ७३७, क्षेत्र ४६.८२ चौ.मी., सिटी सर्व्हे नंबर ९३८, क्षेत्र-१६९.७३ पैकी ६७.७३ चौ.मी. व त्यामधील अलिबाग नगरपालिका घर मिळकत ०.१५१४ (नविन घर नं ZIMKT001785, ALB000001783) व सदर मिळकती मधील विहिर

वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे. असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर आलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दि. १३/१२/२०२४

**ॲड. राजीव नथुराम शेरमकर**
रा. समर्थ को. ऑप. हौसिंग सोसायटी,
रोहिदास नगर, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. शैलेश माधव चांगले, रा. रूम नं.६०३, एकदंत अपार्टमेंट, एस.के.रोड, दादर मुंबई ४०००२८ यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि.रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू=पैसे |
|---|---|---|---|
| १५४ | १/ब /२/ब | १-१९.०० | ०=८२ |

यापैकी लिहून घेणार यांस दिलेले क्षेत्र ०-१७.०० हेक्टर.
तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख:- १४-१२-२०२४.

**श्री. विवेक अशोक धनवी,**
बी.कॉम.,एल्एल्.बी.,ॲडव्होकेट,
ऑफीस गाळा नं. ७ सुमनराज को-ऑप.
हौऊ. सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड,
मोबाईल नंबर ९०११ ७३६००२.

## महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १२-१८, २०२४/अग्रहायण २१-२७, शके १९४६
### उप विभागीय अधिकारी, अलिबाग, उप विभाग अलिबाग, रायगड यांजकडून
### पुरवणी ३२ (२) अधिसूचना

क्रमांक उविअ/एसआर-०२/शहाबाज/पोहोच रस्ता/पुरवणी/२०२४, म.औ.वि.म.- ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) यांच्या कलम एक पोट-कलम (३) अन्वये दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली प्रकरण ६ तसेच दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी अधिसुचित केलेल्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे. त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संपादन करण्यास अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी /१८९२ (१७४४१)/ उद्योग १४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आयडीसी/२०१९ (प्र.क्र. ४५५ ) / उद्योग-१४, दिनांक १७ एप्रिल २०२३ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलम ३२, कलम ३३, कलम ३६ व कलम ३८ चे अधिकार आणि कलम २ (क) अन्वये उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग, जि. रायगड यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या क्षेत्राची महामंडळास धेरंड, शहापूर औद्योगिक क्षेत्राच्या पोहच रस्त्याकरिता जमिनी संपादन करणे आवश्यक आहे असे उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभाग अलिबाग यांना वाटते;

उप विभागीय अधिकारी अलिबाग, उप विभागीय अलिबाग यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (२) ची अधिसूचना क्रमांक उविअ/एसआर-०२/शहाबाज/अलिबाग/२०२३ जुन २९ जुलै ५, २०२३ अन्वये घोषित केली. सदर अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार-ब, दिनांक १३ एप्रिल २०२३, पृष्ठ क्रमांक १ ते ३ वर प्रसिद्ध झाली आहे. खालील अनुसुचीतील स.नं./गट नं. संयुक्त मोजणी अंती नव्याने संपादनात समाविष्ट होत आहेत. परंतु उक्त अधिसूचनेत प्रसिद्ध करण्याचे राहिले आहेत. खालील नव्याने समाविष्ट होणारे सर्व्हे नं./गट नं./क्षेत्र व हिस्सा नंबर या पुरवणीद्वारे प्रसिद्ध करण्याचे येत आहेत.

ज्यांची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीशीचे तारखेपासून एक महिन्याच्या आत भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ०१-०० वाजेपर्यंत खालील सही करणाऱ्याच्या कार्यालयात अलिबाग येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर रहाता येईल.

**अनुसूची**
**मौजे शहाबाज, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९६ पै | ०.०७३० | ६ | ६१८ पै | ०.३६८० |
| २ | ९९ पै | ०.०५८५ | ७ | ६२३ पै | ०.२९९० |
| ३ | ५७६ पै | ०.०४०० | ८ | ६२४ पै | ०.३०११५ |
| ४ | ५८५ पै | ०.२४२० | ९ | ९८७ पै | ०.०२०५ |
| ५ | ६१७ पै | ०.००३० | | **एकूण क्षेत्र** | **१.११५५** |

अलिबाग,
दिनांक ४ डिसेंबर २०२४.

**मुकेश चव्हाण,**
**उप विभागीय अधिकारी अलिबाग,**
**उप विभाग, अलिबाग.**

**(क्र.जिमाका/राअ/जाहि/१७३/२०२४- २५)**

**Anjuman Islam Janjira Murud, Murud Janjira Raigad**
**REQUIRES**

Applications are invited for the post of Junior Clerk from candidate for the following Aided High School.

| Sr. No. | Name of School | No.of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Anjuman Islam Janjira High Schoool Shriwardhan, Tal.Shriwardhan | 1 | B.A/B.Com/ B.Sc MS-CIT |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud

Email Id: aijheadoffice1907@gmail.com

**टिप :- उमेदवारांना मराठी, इंग्रजी येणे आवश्यक आहे.**

**Note :** Preference should be given to Marathi & English knowing candidate.

Note: After Scrutiny of all applications received only those candidate will be informed of the "Walk in interview" who satisfy of all the norms and qualification

**Gen Secretary**
Anjuman Islam Janjira Murud

## जाहीर नोटीस

दिनांक : १४ डिसेंबर, २०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| राहुल श्रीराम हजारे <br> संदेश रमेश हजारे | २७/४/अ | ५ | ३२५.०० | ३२ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला,
साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ,
नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
**नितीन अर्जुन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
दिनांक :-१४/१२/२०२४
मो.नं.९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड, येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे मालक अनिस महमद दाऊद राऊत वगैरे यांजकडून कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चौल, ता. अलिबाग, जि.रायगड येथील गट नंबर १५०१/१, एकूण क्षेत्र १-२०-२० हे. आर, आकार २८-१३ रु. या मिळकतींपैकी ०-०५-१ हे.आर ही मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १३.१२.२०२४

सही/-
**(ॲड.श्री.प्रसाद विजय वर्तक)**
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, रायगड यांचे कार्यालय**
**मा.जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालयाचे आवरात, अलिबाग-४०२ २०१**
दुरध्वनी क्र. ०२१४१-२२२४२८, email:dslrraigad@gmail.com

क्र/अपील/एस.आर.३१/२०२३/ता.खालापूर/जि.रायगड/२०२४/३६९७ अलिबाग दिनांक १२/१२/२०२४

## जाहीर नोटीस

प्रति,
१.श्री.जर्नादन लक्ष्मण साळुंखे — अपीलदार
रा.मु.उंबरे, ता.खालापूर, जि.रायगड
विरूद्ध
१.उप अधिक्षक भूमि अभिलेख, खालापूर — जाबदार
ता.खालापूर, जि.रायगड

२.श्री.अमजद लईक अहमद शेख
३.श्रीमती बिल्कीस लईक शेख
४.श्री.लईक अहमद रफिक शेख
५.श्री.किरीट वाडीलाल शहा
६.श्रीमती.दिपलाबेन किरण पारेख
७.श्री.भुपेंद्र वाडीलाल शहा
८.श्री.अरविंद प्रविणचंद्र शहा
९.श्री.शांतीलाल भोगिलाल शहा
१०.श्री.शैलेश प्रविणचंद्र शहा
११.श्री.अमित जगदिश मलिक
१२.श्री.जगदिशलाल जैरादास मलिक
१३.श्री.जतिन जगदिश मलिक
१४.श्री.केशव राम निकम
१५.श्री.शैलेश प्रविणचंद्र शहा
१६.श्रीमती शेवंता हिरू पाताडे
१७.श्री.कमलेश्वर राजबली सिंह

क्र.२ ते १७ रा.मु.उंबरे, ता.खालापूर, जि.रायगड

विषय : मौजे उंबरे, ता.खालापूर, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१६७, हिस्सा नं.३ अ या मिळकती बाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत

संदर्भ : १.अर्जदार श्री.जनार्दन लक्ष्मण साळुंखे यांचा दि.०७.०६.२०२३ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील पत्र क्र.अपील क्र.३१/२०२३/जा.क्र.३६१७ दिनांक ०३/१२/२०२४

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपील प्रकरण दाखल करून घेणेकामी सुनावणीची तारीख ०८.०८.२०२३, २२.०८.२०२३, २९.०८.२०२३, ०५.०९.२०२३, १२.०९.२०२३, १३.०९.२०२३, २६.०९.२०२३, १०.१०.२०२३, १७.१०.२०२३, ३१.१०.२०२३, ०७.११.२०२३, २१.११.२०२३, ०५.१२.२०२३, १२.१२.२०२३, १९.१२.२०२३, २६.१२.२०२३, ०९.०१.२०२४ २६.११.२०२४ व १०.१२.२०२४ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहीर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून सुनावणी पुढील तारीख ०७/०१/२०२५ नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी सकाळी/दुपारी ११.०० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख रायगड मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजून आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १२/१२/२०२४

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
रायगड, मु.अलिबाग.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**IIFL FINANCE**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **17.12.2024 रोजी दुपारी 01:00 ते 03:30** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **24.12.2024** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **पनवेल-सेक्टर 19 जीएल - आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, गिरिजा आनंद बनवली , ग्रा. मजला, दुकान क्रमांक 1/2/3, से-19, स्टेशन रोड, विजय मार्ग , नवीन पनवेल-410206**

**शाखेचे नांव: कर्जत-कर्जत जीएल, तालुका - कर्जत.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32706679, GL30735167, GL30696827, GL30702815, GL30673360, GL23983000, GL30550223, GL30556609, GL30534653, GL32448462, GL32437526, GL32380237, GL30467760, GL30469536, GL31140597, GL31669317, GL31065905, GL30736677, GL30710892, GL30713689, GL30684217, GL26244097, GL32573138, GL31881817, GL31141437, GL31674433, GL31071227.

**शाखेचे नांव: मुंबई एनएम-कळंबोली जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30755319, GL30743344, GL30754583, GL32492939, GL32684875, GL30667582, GL30678454, GL32571320, GL30620869, GL30614593, GL30585176, GL23350166, GL32480456, GL32482603, GL32447660, GL23297885, GL30507287, GL30462265, GL30440394, GL32315665, GL23233315, GL32178247, GL18841934, GL30758768, GL30758112, GL30758319, GL30683147, GL30681798, GL32584192, GL30625766, GL30627807, GL30595590, GL32497237, GL32497749, GL32471253, GL29438041, GL30510186, GL32337101, GL32195096.

**शाखेचे नांव: मुंबई एनएम-खोपोली जीएल, तालुका - खालापूर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30755125, GL32711123, GL31868938, GL25989945, GL30679514, GL30669030, GL30634777, GL30707243, GL30608087, GL30620787, GL32531253, GL32520253, GL25672278, GL30526845, GL30525514, GL32447700, GL32420786, GL32372056, GL30470920, GL30455694, GL31211473, GL32210495, GL31589609, GL33752879, GL30758716, GL31876454, GL30683441, GL30875810, GL30681420, GL32560653, GL30628434, GL32550310, GL30543058, GL31193676, GL30541760, GL32471279, GL32439063, GL32407057, GL31224913, GL32226261, GL31603024.

**शाखेचे नांव: मुंबई एनएम-मोहोपाडा-न्यू पोसरी जीएल, तालुका - खालापूर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32711221, GL32695771, GL30678547, GL30560900, GL30547271, GL30503398, GL32367531, GL32219451, GL31654751, GL29493411, GL29273189, GL32995106, GL30681800, GL32225251.

**शाखेचे नांव: मुंबई एनएम -पनवेल उरण नाका, तालुका - पनवेल .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:**GL30698141, GL32570977, GL32362840, GL30711524.

**शाखेचे नांव: कामोठे-सेक्टर 18 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30750923, GL23478668, GL30708918, GL24925816, GL32600454, GL32568063, GL30589659, GL32523592, GL30556936, GL32436542, GL32384279, GL30506226, GL30462387, GL30464515, GL32349464, GL30442972, GL32350227, GL32349763, GL32301726, GL30408585, GL32249732, GL30760814, GL30710380, GL32593674, GL30597536, GL30508343, GL30483301, GL30484466, GL31770854, GL33000078, GL32308711, GL30420539, GL32256632.

**शाखेचे नांव: मुंबई-खारघर-सेक्टर 13 कुलस्वामिनी, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL27289510, GL23458539, GL23367541, GL31829782, GL30506088, GL30451719, GL30474423, GL30453011, GL32303531, GL30406506, GL32304293, GL30415950, GL29737415, GL31286190, GL23832757, GL27016862, GL29209449, GL31834464, GL32446523, GL32279905, GL30508337, GL33007433, GL30478148, GL30478000, GL32309616, GL32318998, GL30420040, GL32310011, GL31682558, GL29745591, GL29377128, GL27023051.

**शाखेचे नांव: मुंबई-पनवेल सेक्टर 19 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32700219, GL32704150, GL23533461, GL30748046, GL23460491, GL32576130, GL30607615, GL32538032, GL30588276, GL30559052, GL19426202, GL31485116, GL30760026, GL27490092, GL30626566, GL32552113, GL30828600, GL31002328, GL30572736.

**शाखेचे नांव: मुंबई-उरण बाजार पेठ जीएल, तालुका - उरण.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30579016, GL32523726, GL30552076, GL32466589, GL30469976, GL31404135, GL26126662, GL27350449, GL26911244, GL23775415, GL32472131, GL30478098, GL26142223, GL27364529, GL23786255, GL26124743.

**शाखेचे नांव: तळोजा फेज 1 जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30722831, GL30636944, GL23375587, GL23354113, GL31804858, GL30477097, GL30427966, GL31618606, GL31444577, GL31383205, GL29347183, GL31140935, GL30738824, GL34162504, GL30657067, GL31606851, GL26976573, GL32374518, GL31519216, GL30448027, GL31623423, GL29351884, GL31229998, GL31141522.

**शाखेचे नांव: नेरल जीएल, तालुका - कर्जत.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30756176, GL30698853, GL30677206, GL24985115, GL32543509, GL30619258, GL30568583, GL32335252, GL32515094, GL30550148, GL32372792, GL30492656, GL32377745, GL30414470, GL30893812, GL30759238, GL32234509, GL30711869, GL30681463, GL32565060, GL30756447, GL31573080, GL30594373, GL32458114, GL32336519, GL32547711, GL32405839, GL32409246, GL30421948, GL30899627.

**शाखेचे नांव: उलवे जीएल, तालुका - पनवेल.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL25585458, GL30735805, GL30695701, GL30652003, GL30611952, GL30614200, GL30592884, GL32383913, GL30453001, GL30445331, GL29654428, GL22753105, GL33849380, GL30710427, GL34321965, GL30627281, GL30627723, GL30594095, GL32405198, GL30459991, GL33203968, GL30446364, GL32643432, GL29658568, GL33836781.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 14.12.2024**
**स्थळ: रायगड (एमएच)**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी

# मुंबई संघ उपांत्य फेरीत!

### रहाणे-शॉच्या फलंदाजीसमोर विदर्भचा संघ पडला फिका



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**
**अजिंक्य रहाणे-पृथ्वी शॉची बेधडक सुरूवात, शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगेच्या भागीदारीच्या जोरावर मुंबई संघाने विदर्भचा ६ विकेट्सने आणि ४ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला. या विजयासह मुंबईचा संघ उपांत्य फेरीत पोहोचला आहे.**

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. सध्या उप उपांत्यपूर्व फेरीचे सामने खेळवले जात आहे. यामध्ये मुंबई विरूद्ध विदर्भ असा अटीतटीचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना विदर्भ संघाने २२१ धावांचा डोंगर उभारला. मुंबईच्या या विजयात अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉची सुरूवात निर्णायक ठरली. या दोघांनी ६ षटकांत ८२ धावा केल्या आणि मुंबईच्या विजयाचा पाया रचला.

उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात विदर्भ संघाने प्रथम फलंदाजी करताना २२१ धावांचा डोंगर उभारला. विदर्भ कडून अथर्व तायडेने ६६ धावा, करूण नायरने २६ धावा सुरुवात करून दिली. यानंतर अपूर्व वानखेडे आणि शुभम दुबे यांनी चांगली भागीदारी रचत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मदत केली. अपूर्व वानखेडेने झंझावाती अर्धशतक झळकावले तर शुभम दुबेने ४३ धावांचे योगदान दिले. या फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर विदर्भाने मोठी संख्या उभारली आणि मुंबई संघाला विजयासाठी २२२ धावांचे मोठे आव्हान दिले. मुंबईकडून अथर्व अंकोलेकरने २, सूर्यांश शेडगेने २ तर तुश कोटियनने एक विकेट मिळवली. तर विदर्भकडून दिपेश परवानीने २, हर्ष दुबेने १ आणि यश ठाकूरने १ विकेट घेतली.

मुंबई संघाकडून अजिंक्य रहाणे आणि पृथ्वी शॉ यांची जोडी फलंदाजीला उतरली. पृथ्वीच्या सुरुवातीपासूनच आपल्या जुन्या फॉर्मत परतल्याचे दिसून त्याने पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने २६ चेंडूत ४९ धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर वादळी फलंदाजी करणाऱ्या अजिंक्य रहाणेचे थोडक्यासाठी शतक हुकले. अजिंक्य रहाणेने तीन षटकार आणि दहा चौकारांच्या मदतीने ४५ चेंडू ८४ धावांची मॅच विनिंग खेळी केली. यानंतर श्रेयस अय्यर आणि सूर्यकुमार यादव या महत्त्वाच्या सामन्यात फेल ठरले. यानंतर शिवम दुबे आणि सूर्यांश शेडगे यांनी चांगली भागीदारी रचत मुंबई संघाला चार चेंडू शिल्लक ठेवून विजय मिळवून दिला. सूर्यांश शेडगेने अखेरच्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर षटकार लगावत संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. मुंबई संघाने प्रत्युत्तरात ४ बाद २२४ धावा केल्या. अजिंक्य रहाणेच्या या मॅच विनिंग खेळीसाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

विदर्भ संघाच्या २२१ धावा आणि मुंबईने केलेल्या २२४ धावा म्हणजेच एकूण ४४५ धावा अशी मोठी धावसंख्या या टी-२० सारन्यात उभारली गेली. जी मुंबई वि. विदर्भच्या सामन्यांतील सर्वात मोठी धावसंख्या आहे.

## गिलेस्पी यांचा राजीनामा सादर

**लाहोर :** पाकिस्तान कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक जेसन गिलेस्पी यांनी राजीनामा दिला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आकिब जावेद यांची कसोटी संघाचे अंतरिम मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने गुरुवारी ही माहिती दिली.



पीसीबीच्या काही निर्णयांवर गिलेस्पी खूश नव्हते. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी त्यांनी बोर्डाला याबाबत माहिती दिली. गिलेस्पी यांची या वर्षी एप्रिलमध्ये पाकिस्तानच्या कसोटी संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली होती. पाकिस्तान संघ २६ डिसेंबरपासून सेंच्युरियनमध्ये पहिली कसोटी खेळणार आहे, तर दुसरी कसोटी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये खेळवली जाणार आहे. याआधी पाकिस्तानला दक्षिण आफ्रिकेत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका खेळायची आहे.

## आदिवासी क्रीडा स्पर्धा

# १२४४ खेळाडूंचा सहभाग



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आदिवासी विकास विभागाच्या पेण प्रकल्प अंतर्गत येणाऱ्या आश्रम शाळा यांच्या क्रीडा स्पर्धा या कर्जत तालुक्यातील पिंगळस येथील शासकीय आश्रमशाळेत आयोजित करण्यात आल्या.पेण प्रकल्पांतर्गत असलेल्या १७ आश्रमशाळांमधील १२४४ विद्यार्थी खेळाडू सहभागी झाले होते.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आयोजित प्रकल्प क्रीडा स्पर्धा २०२४-२५ या स्पर्धेचा आयोजन शासकीय आश्रम शाळा पिंगळस येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. पेण प्रकल्पमध्ये रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे आयोजन प्रकल्प अधिकारी गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा यशस्वी होण्यात शासकीय आश्रमशाळेचे मुख्यध्यापक मागाडे, दिनकर सोनावणे, शरमकर, जयंती पाटील, उत्तम पाटील, सारवणे यांचा मोठा सहभाग होता. आदिवासी विभागाच्या क्रीडा स्पर्धांमध्ये धावण्याच्या स्पर्धा तसेच थाळी फेक, भाला फेक, उंच उडी, लांब उडी, कबड्डी, खो-खो अशा स्पर्धा भरवल्या गेल्या. दीपक विना, प्रदीप पवार यांची समारोप सोहळ्याला उपस्थिती होती. पेण प्रकल्प आदिवासी विकास विभागात शासकीय आश्रमशाळा यांच्या क्रीडा स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना ठाणे विभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

# कॅलेंडर वर्षात झळकावली चार शतके

- **स्मृती मानधनाच्या नावे विश्वविक्रम**
- **जगातील पहिली महिला फलंदाज**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने भारताविरूद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत ३-० ने निर्भेळ मालिका विजय मिळवला आहे. सलग २ सामने जिंकून ऑस्ट्रेलियाने मालिकेत अभेद्य आघाडी मिळवली होती. पण भारतीय संघाला तिसरा सामना जिंकण्याची पूर्ण संधी होती, कारण अरूंधती रेड्डीचे ४ विकेट्स आणि त्यानंतर स्मृती मानधनाचे शतक या जोरावर भारताने चांगली सुरूवात केली होती. पण अखेरीस संघाला तिसऱ्या वनडेतही पराभव पत्करावा लागला. स्मृती मानधनाचे शतक जर संघाच्या कामी आले नसले तरी एक विश्वविक्रम मात्र आपल्या नावे केला आहे.



पर्थच्या मैदानावर खेळल्या जात असलेल्या तिसऱ्या सामन्यात भारतीय संघाला २९९ धावांचे मोठे लक्ष्य मिळाले आहे, ज्याचा पाठलाग करताना सलामीवीर स्मृती मानधनाने मोठी कामगिरी केली आहे. ॲनाबेल सदरलँडच्या शानदार शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत ६ गडी गमावून २९८ धावा केल्या. ॲनाबेल सदरलँडने ९५ चेंडूत ९ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ११० धावा केल्या.

ऑस्ट्रेलियाच्या मोठ्या धावसंख्येला प्रत्युत्तर देताना भारतीय सलामी जोडीची सुरुवात खूपच खराब झाली. रिचा घोष १६ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. यानंतर हरलीन देओलने स्मृती मानधनाला साथ देत दुसऱ्या विकेटसाठी १०० हून अधिक धावांची भागीदारी केली.

स्मृती मंधानाने ३४व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर दोन धावा घेत एकदिवसीय कारकिर्दीतील तिचे ९वे शतक झळकावले. तिने १०३ चेंडूत १३ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकदिवसीय सामन्यात दुसरे शतक झळकावले. अशाप्रकारे ऑस्ट्रेलियाविरुद्ध २ वनडे शतक झळकावणारी मंधाना पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. याआधी कोणत्याही भारतीय महिला क्रिकेटपटूला ही मोठी कामगिरी करता आली नाही. ऑस्ट्रेलियन भूमीवर एकापेक्षा जास्त एकदिवसीय शतक झळकावणारी मानधना ही पहिली महिला खेळाडू ठरली आहे.

स्मृती मानधनाचे या वर्षातील हे चौथे एकदिवसीय शतक असून तिने एक मोठा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. वनडे क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात ४ शतकं झळकावणारी मानधना जगातील पहिली महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

## कोहली बनला टीम इंडियाचा ‘मेंटॉर’

**ब्रिस्बेन :** विराट कोहली कर्णधार असताना भारतीय संघाच्या सराव सत्रादरम्यान तो आकर्षणाचे केंद्र असायचा. गुरुवारी विराटने सरावादरम्यान ॲडिलेडमध्ये दिवस-रात्र सामना दहा गड्यांनी गमविल्यानंतर महत्त्वपूर्ण अशा तिसऱ्या कसोटीआधी सहकारी खेळाडूंना विजयाची प्रेरणा आवश्यक होती.

युवा खेळाडूंना मार्गदर्शन करण्यासाठी किंग कोहलीपेक्षा उत्कृष्ट मेंटॉर असू शकत नाही. विराट कर्णधार असताना सरावाच्या वेळी सहकाऱ्यांसोबत चांगलाच हितगुज करायचा. नेतृत्व सोडल्यापासून त्याने ही पद्धत बंद केली होती. सलग चार पराभवांमुळे कर्णधार रोहित शर्मावर दडपण आले आहे.

# सौदी अरेबिया २०३४ फुटबॉल विश्वचषकाचे यजमानपद भूषवणार



**। झुरिच । वृत्तसंस्था ।**

२०३४चा फुटबॉल विश्वचषक सौदी अरेबियात खेळवला जाणार आहे. एवढेच नाही तर २०३०च्या विश्वचषकाचे आयोजन स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्को संयुक्तपणे करणार आहे. जागतिक फुटबॉल नियामक मंडळ फिफाने बुधवारी रात्री याची घोषणा केली.

२०३४च्या विश्वचषकाच्या आयोजनासाठी फक्त सौदी अरेबियाने बोली लावली होती. अशा परिस्थितीत झुरिचमध्ये जागतिक संघटनेच्या विशेष बैठकीनंतर अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी सौदी अरेबियाला अधिकृत यजमान म्हणून घोषित केले. या घोषणेनंतर अनुभवी फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने एक पोस्ट शेअर केली आहे. त्याने लिहिले, आतापर्यंतचा सर्वात खास विश्वचषक, स्वप्न पूर्ण झाले. पोर्तुगाल २०३०च्या विश्वचषकाचे यजमानपद भूषवणार आहे आणि आम्हाला त्याचा अभिमान आहे.यापूर्वी १९३० मध्ये उरुग्वेने विश्वचषकाचे आयोजन केले होते. २०३०च्या विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या सामन्याचे आयोजन केले जाईल. उद्घाटन सोहळाही याच देशात होणार आहे. उरुग्वे व्यतिरिक्त, अर्जेंटिना आणि पॅराग्वेदेखील २०३० च्या विश्वचषकातील प्रत्येकी एक सामना आयोजित करतील.पुढील फुटबॉल विश्वचषक २०२६ मध्ये होणार आहे.

## गोखले महाविद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे यांच्या हस्ते वार्षिक क्रीडा स्पर्धा सन २०२४/२५ उद्घाटन समारंभ करण्यात आला. व्यासपीठावरून बोलताना प्रा. किशोर लहारे यांनी, विद्यार्थ्यांनी पुस्तकी शिक्षणा बरोबरच सर्व प्रकारच्या स्पर्धेत सहभाग घेऊन आपला शारीरिक व मानसिक विकास घडवायला हवा. प्रसंगी वरीष्ठ महाविद्यालय क्रीडा विभाग प्रमुख, प्रा. विवेक माने व कनिष्ठ महाविद्यालय क्रीडा विभाग प्रमुख, प्रा. नवज्योत जावळेकर यांनी विशेष नियोजन केले होते.

इनडोअर गेम्समध्ये कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन स्पर्धा तसेच आऊटडोअर स्पर्धेत खो-खो, कबड्डी, लांबउडी, उंचउडी, गोळा फेक, थाळी फेक, व्हॉलीबॉल, क्रिकेट, शंभर, दोनशे, व चारशे मीटर धावणे अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धा पार पाडण्यात महाविद्यालयातील क्रीडा समिती सदस्य, प्रा. राजु गोरूले, प्रा. सागर कुंभार, प्रा. बी. यु. पाटील, डॉ. निलेश चव्हाण, प्रा. शिवराज पाटील, डॉ. कल्याणी नाझरे, प्रा. मृण्मयी भुसाने, प्रा. शिंदे यांनी विषेश परीश्रम घेतले.


## क्लासिफाईड्स
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

- ३ BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. ३ बेडरूम, ३ बाथरूम, किचन, हॉल, रॉयल मोटार जवळ अलिबाग, ९९७५४९०१६४

- नोकरी! नोकरी !! नोकरी!!! * नवोदित पाहिजेत..* केवळ पुरुष उमेदवार, शिक्षण -१२वी, पदवीधर, द्वी पदवीधर .
पगार - ₹१०,०००/- ते १२०००/- पर्यंत. (योग्यतेनुसार)
कामकाज कालावधी - दिवस पाळी ८ तास. ठिकाण - अलिबाग, चेंढरे. ९८२२०९५८०३.

- रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं हव आहे !!
संपर्क : ९६०७१०२३५७ ठिकाण - सासवणे

- तत्काळ पाहिजे : अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी असिस्टंट कुक आणि वेटरची आवश्यकता आहे.
संपर्क : ०८४८३९७३१०३

- अलिबागपासून एक किलोमीटर अंतरावर एक एकर रहिवासी (R zone) जमीन रिसॉर्ट साठी लीजवर देणे आहे.
संपर्क : ९९६०२६४६६०/९४२२४९४६०३

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे १०/१२ वी ९२७०५६०४५६

- आम्ही ऑनलाईन, ऑफलाईन आणि Gem पोर्टल वर AMC (वार्षिक देखभाल) सरकारी निम-सरकारी, खाजगी निविदा भरावयाचे कामे घेतो. Gem नोंदणी (Regn), सर्विस कॅटलॉग, विक्रेता नोंदणी इ. अधिक माहिती करीता संपर्क: 9987101960

- अलिबागमध्ये समुद्राजवळ 1BHK; 641 चौ.फुट विकणे आहे. संपर्क : ८४५९८९९६०३/९२८४०८४२९१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# विराट-रोहितला कसोटी क्रमवारीत धक्का





**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीच्या नव्या कसोटी क्रमवारीत मोठी उलथापालथ झाली आहे. आतापर्यंत जो रूट फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर होता, मात्र आता बऱ्याच काळानंतर रूट क्रमवारीत दुसऱ्या स्थानी घसरला आहे. तर ट्रॅव्हिस हेड, कामेंदू मेंडिस, टेम्बा बावुमा यांना यावेळी मोठा फायदा होताना दिसत आहे. यावेळी टॉप १० यादीत अनेक मोठे बदल स्पष्टपणे दिसत आहेत. तर भारतीय फलंदाजांना धक्का बसला आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या नवीन कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा हॅरी ब्रूक आता अव्वल क्रमांकाचा फलंदाज बनला आहे. ब्रुकने जो रूटला मागे टाकत आयसीसी कसोट क्रमवारीत पहिले स्थान मिळवले आहे. यापूर्वी तो दुसऱ्या क्रमांकावर होता. आता त्याचे रेटिंग ८९८ गुणांवर पोहोचले आहे. जो रूट दुसऱ्या स्थानी गेला असून त्याचे रेटिंग ब्रुकपेक्षा एका गुणाने म्हणजेच ८९७ आहे. न्यूझीलंडचा केन विल्यमसन ८१२ रेटिंगसह तिसऱ्या स्थानावर आणि भारताचा यशस्वी जैस्वाल ८११ रेटिंगसह चौथ्या स्थानावर कायम आहे. त्याच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही.

दरम्यान, भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत शानदार शतक झळकावल्याचा फायदा ट्रॅव्हिस हेडला झाला आहे. त्याने एकाचवेळी ६ स्थानांनी झेप घेतली आहे. तो आता ७८१ च्या रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर पोहोचण्यात यशस्वी झाला आहे. श्रीलंकेच्या कामेंदू मेंडिसलाही एका स्थानाचा फायदा झाला आहे. तो आता ७५९ च्या रेटिंगसह ६व्या क्रमांकावर पोहोचला आहे. दक्षिण आफ्रिकेचा कसोटी कर्णधार टेम्बा बावुमालाही तीन स्थानांचा फायदा होताना झाला आहे. तो आता ७५३ च्या रेटिंगसह ७व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

दरम्यान, झीलंडच्या डॅरिल मिचेलला तीन स्थानांचे नुकसान झाले आहे. तो आता ७२९ रेटिंगसह ८व्या क्रमांकावर पोहोचला आहे. भारताच्या ऋषभ पंतलाही फटका बसला असून तो आता ७२४ च्या रेटिंगसह ९व्या क्रमांकावर घसरला आहे. पंत ३ स्थानांनी घसरला आहे. पाकिस्तानच्या सौद शकीलचेही रेटिंग ७२४ आहे, त्यामुळे तो पंतसह संयुक्तपणे नवव्या क्रमांकावर आहे. भारताच्या विराट कोहलीला ६ स्थानांचा फटका बसला असून तो २० व्या क्रमांकावर घसरला आहे.

## अरूंधती रेड्डीची भेदक गोलंदाजी

**मुंबई :** भारत-ऑस्ट्रेलिया महिला संघाच्या मालिकेतील तिसऱ्या वनडे सामन्यात भारताच्या अरूंधती रेड्डीने भेदक गोलंदाजी केली. भारतीय संघाने पहिल्या दोन्ही सामन्यात अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली नव्हती आणि परिणामी दोन्ही सामन्यांमध्ये संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. यासह ऑस्ट्रेलियाने ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी मिळवली. त्यामुळे तिसऱ्या सामन्यासाठी संघात बदल करण्यात आला. प्लेईंग इलेव्हनमध्ये वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डीचा समावेश करण्यात आला आणि तिने तिची निवड पूर्णपणे योग्य असल्याचे सिद्ध केले. अरुंधती रेड्डीने गोलंदाजीला सुरूवात करेपर्यंत ऑस्ट्रेलियन संघाने एकही विकेट न गमावता ५० धावा केल्या होत्या. यानंतर रेड्डीने आधी जॉर्जिया वोलला क्लीन बोल्ड केलं आणि त्यानंतर त्याने ऑस्ट्रेलियन संघाला आणखी तीन धक्के दिले. रेड्डीने फोबी लिचफिल्ड, बेथ मुनी आणि एलिस पेरी यांनाही पॅव्हेलियनमध्ये पाठवले.

## राष्ट्रीय लाठीकाठी स्पर्धा

### अलिबागच्या खेळाडूंनी केली १५ सुवर्ण पदकांची कमाई



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गोव्यात नुकतीच पाचवी राष्ट्रीय लाठीकाठी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील खेळाडूंनी १५ सुवर्ण, ३ रौप्य, २ कांस्य अशी एकूण २० पदके मिळवली.

आठ वर्षाखालील मुलींच्या गटात रुद्रा अंकिता विनय पिळणकर एकम लाठीमध्ये १, द्विलाठी प्रकारात १, द्विअनिकामध्ये १ अशी एकूण तीन सुवर्ण पदके पटकावली. अवनी पाटील द्विलाठी आणि पंचम लाठी प्रकारात सुवर्ण पदक मिळवले. सिमरन ठाकूरने द्विअनिका व पंचम लाठी मध्ये सुवर्ण पदक मिळवलं. ऋचा पाटीलने द्विअनिका व पंचम लाठी प्रकारात सुवर्ण पदकाची कमाई केली. ओवी भिंवडेने द्विअनिका व पंचमलाठीमध्ये सुवर्ण पदक मिळवलं. आराध्या नखातेने द्विअनिका व पंचम लाठीमध्ये सुवर्ण पदक मिळवलं. श्लोक जाधवने एकमलाठीमध्ये रौप्य, काठपवित्र प्रकारात सुवर्ण व द्विलाठीत रौप्य पदकाची कमाई केली. श्रेयस म्हात्रे एकलाठीमध्ये रौप्य, शिवम संदेश गुंजाळने एकम लाठ व द्विलाठीत सुवर्ण पदक जिंकले. अर्णव पाटील द्विलाठीत सुवर्ण तर काट पवित्र प्रकारात कांस्य पदक मिळवले.

### मुंबई मॅरेथॉनच्या टी-शर्ट व शूजचे अनावरण

# एबडेनला नवा साथीदार हवा होता : रोहन बोपन्ना



**। मुंबई । प्रतिनिधी ।**
**दोन वर्ष मॅथ्यू एबडेनसोबत केलेला खेळ संस्मरणीय ठरला. त्याच्यासोबत यादरम्यान अनेक स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली. पण, आता त्याला आगामी सत्रात वेगळ्या साथीदारासोबत खेळायचे आहे. त्यामुळे मी निकोलस बरीएंटोससोबत जोडी केली आहे, असे भारताचा दिग्गज टेनिसपटू रोहन बोपन्ना याने सांगितले.**

बोपन्नासाठी २०२४ चे सत्र चांगले ठरले. त्याने ऑस्ट्रेलियाच्या एबडेनसोबत ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरी ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावण्यासह जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानही पटकावले होते. मात्र, आता तो पुढील वर्षी ॲडलेड ओपन आणि ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेत कोलंबियाच्या बरिएंटोससोबत खेळेल. याआधी, बोपन्ना पुन्हा एकदा आपला जुना सहकारी क्रोएशियाचा इवान डोडिग याच्यासह खेळणार असल्याची चर्चा रंगली होती. मात्र, यामध्ये तथ्य नसल्याचे सांगत बोपन्नाने या चर्चांनाही पूर्णविराम दिला. मुंबई मॅरेथॉनच्या टी-शर्ट व शूजचे अनावरण करताना बोपन्नाने संवाद साधला. यावेळी स्टार स्क्वॉशपटू सौरव घोषाल याचीही उपस्थिती होती.तो म्हणाला की, मी डिडिगसोबत जोडी बनवणार असल्याचे वृत्त खोटे आहे. एबडेनला नव्या आता नव्या खेळाडूसह खेळायचे असल्याने माझ्याकडे नवा जोडीदार शोधण्याशिवाय पर्याय नव्हता. एबडेनसोबतचा प्रवास शानदार ठरला. मी आता निकोलससोबत खेळणार असून आगामी ॲडलेड आणि मेलबर्न येथील स्पर्धेत त्याच्यासोबत खेळण्यासाठी मी उत्सुक आहे.

> “माझ्यासोबत माझी अप्रतिम टीम आहे. त्याचप्रमाणे कुटुंबियांकडून मिळणारा पाठिंबा मोलाचा आहे. माझी मुलगी मला खेळताना बघेल, याची मी आशा केली नव्हती. पण, आज ती पाच वर्षांची असून टेनिस कोर्टवर ती मला खेळताना पाहते आणि हे माझ्यासाठी संस्मरणीय ठरत आहे. माझे कुटुंब मला ग्रँडस्लॅम खेळताना पाहतेय याहून दुसरी प्रेरणादायी गोष्ट नाही.”
> – रोहन बोपन्ना

बोपन्ना मार्च महिन्यात वयाची ४४ वर्ष पूर्ण करेल. खेळावरील असलेल्या प्रेमामुळे मला अजूनही प्रेरणा मिळते, असे त्याने म्हटले. बोपन्ना म्हणाला की, मी अजूनही खेळाचा आनंद घेतो. माझ्यामुळे युवा खेळाडू प्रेरित होतात, ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. २०२४ वर्ष माझ्यासाठी सर्वोत्तम ठरले. ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरी जेतेपद, जागतिक दुहेरी क्रमवारीत अव्वल स्थान यामुळे देशाचाही सन्मान झाला. याचा मला अभिमान आहे.

www.krushival.in | कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
शनिवार
दि. १४ डिसेंबर २०२४

# बालांगण





## कसं असावं 'स्क्रीन डाएट'?

हेल्थवेल्थ

छोट्यांनो, स्मार्टफोन आपली गरज बनली आहे. दिवसातला बराच वेळ आपण स्मार्टफोनवर घालवतो. सोबतीला कॉम्प्युटर, लॅपटॉपही असतातच. स्मार्टफोन किंवा कोणतंही गॅझेट गरजेपुरतं वापरायला हवं. त्याचं व्यसन लागता कामा नये. तुमचा हात सारखा स्मार्टफोनकडे जात असेल, स्मार्टफोन वापरल्याशिवाय करमत नसेल तर काहीतरी गडबड आहे असं समजावं. मित्रमैत्रिणींनो, तुमच्या अभ्यासाच्या, खाण्यापिण्याच्या, खेळण्याच्या वेळा ठरलेल्या असतील. त्याचप्रमाणे 'स्क्रीन टाईम' म्हणजे मोबाईलवर किती वेळ घालवायचा हेही ठरवून घ्यायला हवं. याला 'स्क्रीन डाएट' म्हणता येईल. चला तर मग तुमचं 'स्क्रीन डाएट' कसं असायला हवं हे जाणून घेऊ या.

✽ जेवणाच्या टेबलवर स्मार्टफोन वापरणार नाही हे ठरवून टाका. मुख्य म्हणजे त्याप्रमाणे वागा. रात्री नऊनंतर स्मार्टफोन बाजूला ठेऊन द्या. त्याच्याकडे बघूच नका. घरातले काही भाग 'टेक फ्री झोन' म्हणून जाहीर करा. या भागात कोणीच स्मार्टफोनचा वापर करायचा नाही, असा नियम करा. या कामात आई, बाबा, दादा, ताई यांचीही मदत घ्या.

✽ घरातल्या प्रत्येकासाठी हे नियम करायला हवे. यासाठी तुम्ही पुढाकार घ्या. रात्री जेवत असताना घरातल्या सर्वांपुढे हा प्रस्ताव ठेवा. 'स्क्रीन टाईम' कमी करण्याचं महत्त्व पटवून द्या.

✽ स्मार्टफोनमध्ये फोल्डर्स तयार करा. सोशल मीडिया ॲप्स, गेम्स तसंच तुम्हाला भुलवणारी सर्व ॲप्स फोल्डरमध्ये सेव्ह करा. ही फोल्डर्स स्मार्टफोनच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्क्रीनमध्ये ठेवा. आत लपलेली ही फोल्डर्स स्मार्टफोनला हात लावल्यावर तुम्हाला दिसणार नाहीत आणि त्यांचा वापर टळेल.

✽ काही ॲप्स 'स्क्रीन टाईम'चं नियोजन करायला मदत करतात. याद्वारे स्वतःच स्वतःवर लक्ष ठेवा. आपण स्क्रीनवर किती काळ घालवतो याची नोंद करून ठेवा. मग जमेल तसा वेळ कमी करा.

## असा आहे 'कॅल्शिओ स्टोरिको'

फन टाईम

'कॅल्शिओ स्टोरिको' नावाचा खेळ आहे. फुटबॉलमधले धोके तुम्हाला माहीत आहेत. बॉलच्या मागे धावताना खेळाडूंना दुखापत होऊ शकते. बॉल तोंडावर बसू शकतो. 'कॅल्शिओ स्टोरिको'ही असाच भन्नाट खेळ आहे. याला ऐतिहासिक काळातला फुटबॉल म्हणता येईल. रग्बी आणि फुटबॉलचं मिश्रण यात पहायला मिळतं. हा खेळ इटलीत खेळला जातो. यात खेळाडूंना हेल्मेट किंवा पॅड घालता येत नाहीत. मैदानात गवत नाही तर माती असते. तसंच मैदानात खेळाडू एकमेकांशी भांडतात. या खेळात दोन संघ असतात आणि प्रत्येक संघात २७ खेळाडू असतात. फुटबॉलमध्ये बदली खेळाडूला मैदानात आणण्याची परवानगी असते. पण या खेळात तसं नसतं. दुखापत झालेल्या खेळाडूऐवजी दुसरा खेळाडू मैदानात येऊ शकत नाही. त्यामुळे संघाला कमी खेळाडूंसह खेळावं लागतं. हा खेळ इटलीमध्ये सोळाव्या शतकात खेळला जायचा.



छोट्यांनो, कुत्र्यांचा फॅशन शो तुम्ही बघितला असेल. प्राण्यांच्या शर्यती आयोजित केल्या जातात. 'बुल फायटिंग'मध्ये दोन बैल एकमेकांशी झुंजतात. मात्र 'सेंट दिएगो'मध्ये कुत्र्यांच्या सर्फिंगचं आयोजन केलं जातं. वेगवेगळ्या आकाराच्या आणि प्रजातीच्या कुत्र्यांना सर्फ बोर्डवर बसवलं जातं. हा सर्फबोर्ड समुद्राच्या लाटांवर स्वार होतो आणि कुत्रे त्यावर बसून तरंगू लागतात. उसळत्या लाटांमध्ये त्यांना आपला तोल सांभाळायचा असतो. खरं तर ही गमतीशीर स्पर्धा आहे. आत्तापर्यंत एका बोर्डवर १७ कुत्र्यांना बसवण्यात आलं आहे. कुत्र्यांची ही स्पर्धा बघताना खूप मजा येते.

## रंगांची जादू

करून पहा

दोस्तांनो, रंग आपल्या प्रत्येकालाच आवडतात. आकाशातलं इंद्रधनुष्य फारच सुंदर दिसतं. रंगात रंग मिसळले की ते सौंदर्य नजरेत भरतं. एक छोटासा प्रयोग करून रंगांची जादू आपण अनुभवू शकतो. अगदी सोपा, सरळ साधा, घरी करण्यासारखा हा प्रयोग आहे.




**साहित्य** : दूध, खोलगट भांडं (थोडं पसरट असावं), डिश वॉश बार किंवा लिक्विड सोप, लिक्विड वॉटरकलर किंवा खायचे रंग, ड्रॉपर्स इत्यादी.

**कृती** : सर्वात आधी भांड्यात दूध ओता. आता त्यावर वॉटर कलर किंवा खायचा रंग टाका. पांढऱ्या पृष्ठभागावर पडलेले रंग पसरून अनोखी कलाकृती तयार होईल. पांढऱ्या कॅनव्हासवरच्या चित्रात रंग भरल्यासारखंच आपल्याला वाटेल. रंग पसरल्यानंतर तयार होणारी कलाकृती आपल्या डोळ्यांचं पारणं फेडेल. आता आपल्याला त्यात साबण मिसळायचा आहे. रंगाच्या सर्वात मोठ्या पट्ट्यावर साबणाचे थेंब टाका. यासाठी लिक्विड सोप वापरणं जास्त चांगलं. साबणाचे काही थेंब टाकल्यावर रंग सगळ्या दुधावर पसरेल. रंग थुई थुई नाचत असल्याचा भास होईल. आता हे नेमकं कशामुळे होतं हे जाणून घेऊ या. हा एक वैज्ञानिक प्रयोग आहे. दुधात पाणी आणि स्निग्ध पदार्थ असतात. या दोन्ही गोष्टी एकमेकात मिसळत नाहीत. दुधातलं पाणी आणि स्निग्ध पदार्थ वेगळे होतात. पण साबण, पाणी आणि स्निग्ध पदार्थ अशा दोन्हीत मिसळतो. दुधात साबणाचं पाणी टाकल्यानंतर त्याचा एक कण दुधातील पाण्याशी तर दुसरा कण स्निग्ध पदार्थांशी जोडला जातो. यामुळे रंग पसरतात आणि दूध उकळल्यासारखं दिसतं.

## पिनकोड असतो कशासाठी?

माहीत आहे का?

तुम्ही घरात आलेलं पत्र कधी वाचता का? पोस्टकार्ड, आंतरदेशीय किंवा एन्व्हलप पाहिलं तर त्यावर नाव आणि पत्त्याबरोबरच छोट्याशा आयताकार बॉक्समध्ये काही आकडे लिहिलेले दिसतील. हा बॉक्स सहा छोट्या हिश्श्यांमध्ये विभागलेला असतो आणि यात काही नंबर असतात. कुठले असतात बरं हे नंबर? मित्रांनो, यालाच आपण पिनकोड म्हणतो. पिनकोड हे पोस्टर इंडेक्स नंबरचं संक्षिप्त रुप आहे. एक कोड केवळ एकाच टपाल विभागाशी संबंधित असतो. म्हणूनच पिनकोड बिनचूक असेल तर पत्र वेळेत पोहोचतं. या सहा आकड्यातील पहिला आकडा संबंधित राज्याची ओळख सांगतो. दुसरा आणि तिसरा आकडा मिळून वितरण होत असलेल्या टपाल विभागाचा संबंध दाखवतो. त्यानंतरचे तीन आकडे पत्र वितरीत होणाऱ्या टपाल खात्याची ओळख सांगतात. थोडक्यात पहिले तीन आकडे कुठल्या राज्यात टपाल पाठवायचंय ते सांगतात तर नंतरचे तीन आकडे प्रत्यक्ष टपाल विभागाचं स्थान सांगतात. १ एप्रिल १७७४ पासून सामान्य जनतेसाठी टपालसेवा उपलब्ध करुन देण्यात आली. त्यावेळी बंगाल, मुंबई आणि मद्रास एवढ्यापुरतीच ही सेवा मर्यादित होती. सध्या वापरात असणाऱ्या पिनकोड सिस्टिमची सुरुवात झाली १५ ऑगस्ट १९७२ पासून.




आपल्याकडे पिनकोड सिस्टिम आहे तर अमेरिकेत अशाच प्रकारच्या सिस्टिमला झिप आयपी सिस्टिम म्हणतात. त्यात पाच आकडे असतात. इंग्लंडमध्ये या प्रणालीला पोस्टकोड असं म्हणतात. यात अंक आणि शब्द यांचं मिश्रण असतं. मग आता लक्षात राहील ना. सुट्टीत मित्रमंडळींना पत्र पाठवताना नाव आणि पत्त्याबरोबर पिनकोड लिहायला विसरायचं नाही.

## अशी झोपतात बदकं

दोस्त हे मस्त



झोपलेले प्राणी खूप गोंडस दिसतात. प्रत्येक प्राण्याची, पक्ष्याची झोपण्याची पद्धत वेगळी असते. आता बदकांचंच बघा. बदकं समूहाने झोपतात. त्यांना आपल्या सुरक्षेची खूप काळजी असते. म्हणूनच बदकांचं कुटुंब एकत्र झोपलेलं दिसून येतं. बदकं एकमेकांच्या शेजारी रांगेत झोपतात. बाहेरच्या बाजूला असलेली बदकं एक डोळा उघडा ठेऊन झोपतात. आसपासच्या धोक्याचा कानोसा घेतात तर मध्यभागी झोपणारी बदकं सुखी असतात. ती दोन्ही डोळे बंद करून मस्त आराम करतात.

## क्षेत्र 'ॲस्ट्रोबायोलॉजी'चं


करीअर टिप्स

छोट्यांनो, तुम्हाला आकाशातल्या तारेतारका बघायला आवडतात का? तुमची नजर आकाशाकडे लागून राहिलेली असते का? कोणता ग्रह कधी दिसणार हे माहीत असतं का, मग तुम्ही खगोलशास्त्राकडे वळू शकता. 'ॲस्ट्रोबायोलॉजी'चा अभ्यास करून तुम्ही पुढे जाऊ शकता. विज्ञान शाखा घेतल्यानंतर काय करायचं,असा प्रश्न पडला असेल तर ॲस्ट्रोबायोलॉजीचा खूप चांगला पर्याय तुमच्याकडे आहे. ॲस्टोबायोलॉजी हा फक्त एक विषय नाही तर विविध विषयांचा समूह आहे. त्यामुळे या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी आहेत.

'इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स अँड एज्युकेशन' या संस्थेत पाच वर्षांचा एमएस अभ्यासक्रम तुम्ही पूर्ण करू शकता. देशातल्या आयआयटी संस्थांमध्येही या विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यात चार वर्षांचा बीएस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आयआयएससी बंगळूरुत प्रवेश घेता येईल. ॲस्ट्रोबायोलॉजीमध्ये उल्कापिंडांच्या अवशेषांच्या मदतीने विविध ग्रहांवरच्या मातीत आढळणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा अभ्यास तुम्ही करू शकता तर ॲस्ट्रोजिओलॉजीमध्ये ग्रह, त्यांचे उपग्रह तसंच इतर घटकांचा अभ्यास केला जातो. बायोलॉजीमध्ये विविध परिस्थितीत जगू शकणाऱ्या जीवांचा अभ्यास होतो. ॲस्ट्रोनॉमीमध्ये सूर्यमाला, ग्रहतारे यांचा अभ्यास होतो. तुम्ही तुमच्या आवडीनुसार विषय निवडून करीअर करू शकता.



ठिपके जुळवा



## गारेगार 'क्रीमसिकल'

खादाडी

छोट्यांनो, आता गारेगार पेयं प्यायचे दिवस आले आहेत. ही पेयं आरोग्यदायी असली पाहिजेत. नेहमीपेक्षा काही वेगळं प्यायचं असेल तर 'क्रीमसिकल' नावाचं पेयं बनवता येईल. यासाठी दीड कप संत्र्याचा रस घ्या. अर्धा कप दूध, एक केळं, एक छोटा चमचा व्हॅनिला इसेंस आणि बर्फाचे तुकडे असं साहित्य घ्या. ज्यूसरच्या भांड्यात संत्र्याचा रस आणि दूध घाला. त्यात केळ्याचे काप आणि व्हॅनिला इसेंस घाला. आता बर्फाचे तुकडे घालून फिरवून घ्या. हे पेय ग्लासमध्ये ओता. गारेगार प्या.



## ही चोरी ठरते बरं!

संस्कार

काल आर्यनच्या घरातून मोठमोठ्यानं आवाज येत होता. आर्यन बहुदा आईच्या हातचा मार खात असावा. तो किंचाळून रडत होता आणि रडतच रडतच 'मी नाही चोरी केली' असं ओरडत होता. झालं असं होतं की, रमाची एक कलर पेन्सील त्याला भलतीच आवडली. त्या पेन्सीलला मागे डोरेमॉनचं खोडरबर होतं. त्यानं सहज पेन्सील पाऊचमध्ये टाकली आणि घरी आल्यावर त्याचं बिंग फुटलं. तुमच्या बाबतीतही असं कधी झालंय का? आपण सहज म्हणून एखादी वस्तू घेतो आणि आईबाबा त्याला चोरी केली असं म्हणतात. मित्रांनो, आपण काही चोरी करत नाही. बरेचदा मित्रमैत्रिणींना सांगूनही वस्तू घेतो. पण नेहमीच असं करत राहीलं तर ती मात्र चोरी होऊ शकते बरं! आपल्या आजूबाजूला अनेक छानछान वस्तू असतात. त्यापैकी सगळ्याच आपल्याकडे असतात असं नाही. बऱ्याचशा वस्तू आपल्याला हव्याशा वाटत असतात. काही दिवसानंतर त्या मिळतात. पण त्यासाठी थोडी वाट पहावी लागते. एवढाही धीर नसलेली मुले मात्र त्या वस्तू आपल्याकडे असाव्यात म्हणून दुसऱ्याच्या पळवतात. काहीजण जाणूनबुजूनही घेत असतील. पण एकदा ही सवय लागली की आपण लोकांच्या निगेटीव्ह लिस्टमध्ये जातो. आपल्यावर चोरीचा शिक्का बसतो. म्हणूनच कोणाकडूनही न सांगता कुठलीही वस्तू घ्यायची नाही... अगदी कितीही आवडली तरीही! एखाद्या वेळी चुकून दुसऱ्याची वस्तू आपल्याकडे आली तर आठवणीने परत करायची आणि सॉरीदेखील म्हणायचं. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आई-बाबांपासून कुठलीही गोष्ट लपवून ठेवायची नाही. चुकीचं वागल्याबद्दल आईनं अथवा शिक्षकांनी शिक्षा केली तर ती मुकाट भोगायची. कारण आपल्या चांगल्यासाठीच ही शिक्षा असते. तुम्हाला त्या चोराची गोष्ट माहीत असेलच. लहानपणी छोट्या मोठ्या चोऱ्या करणाऱ्या एका मुलाला आईनं कधीच शिक्षा केली नाही. पुढे तो मोठा दरोडेखोर बनला. शेवटी त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली. आदल्या दिवशी त्यानं आईला भेटायची इच्छा व्यक्त केली आणि आई जवळ येताच तिच्या कानाला कडकडून चावा घेत म्हणाला, 'लहानपणीच मला शिक्षा केली असतीस तर आज ही कठोर शिक्षा मिळाली नसती.' कळलं, काय महत्त्व आहे आईच्या शिक्षेचं.



## जगावेगळा 'मॉल्डोव्हा'

सफर देशांची




'मॉल्डोव्हा' हा पूर्व युरोपातला देश. 'मॉल्डोव्हा प्रजासत्ताक' या नावाने तो ओळखला जातो. जुन्या काळात त्याला 'मॉल्डाव्हिया' म्हणत. 'मॉल्डेव्हन' ही इथली अधिकृत भाषा तर 'चिसिनाउ' ही या देशाची राजधानी. 'मॉल्डोव्हा' हा युक्रेन आणि रोमानिया या दोन देशांच्या मध्ये वसलेला छोटा देश आहे. दुसऱ्या महायुद्धाआधी तो रोमानियाचा भाग होता. महायुद्धानंतर १९९१ पर्यंत हा 'सोव्हियत युनियन' म्हणजे आत्ताच्या रशियामध्ये होता. 'मॉल्डोव्हा'ला प्राचीन इतिहास असून इथल्या लोकांना आपली संस्कृती आणि परंपरांचा अभिमान आहे.

'चिसिनाउ' हेच इथलं प्रमुख शहर आहे. देशातले बरेच उद्योग याच शहरात असून ते इथलं व्यावसायिक केंद्रही आहे. 'चिसिनाउ' 'मॉल्डोव्हा'च्या मधोमध वसलं आहे. या देशाचा बराचसा भाग डोंगराळ असला तरी उंचवटे फार नाहीत. 'बालानेस्टी हिल' हा देशातला सर्वात उंच भाग आहे. देशातली ७४ टक्के जमीन सुपीक असून इथे शेती होते तर १३.७ टक्के जमिनीवर जंगल आहे. इथल्या नैसर्गिकसाधनसंपत्तीचं रक्षण केलं जातं. या देशात चार अभयारण्य आहेत. 'रॉयल फॉरेस्ट' हे इथलं सर्वात मोठं अभयारण्य असून इथे ओकची झाडं पहायला मिळतात. सर्वात जुनं झाड ४५० वर्षांपूर्वीचं असल्याचं बोललं जातं. वेगवेगळ्या प्रजातींचे प्राणीही इथे आहेत.

'क्रिकोव्हा' हे इथलं जमिनीच्या खाली वसलेलं शहर आहे. इथे वाईनची निर्मिती केली जाते. 'स्ट्राँग ड्रिंक्स म्युझियम' ही जगातली बाटलीच्या आकाराची सर्वात मोठी इमारत या देशात आहे. या देशात पाहण्यासारखं बरंच काही आहे.

## स्मार्ट होण्यासाठी...

लाईफस्टाईल

आपण स्मार्ट असावं असं प्रत्येकाला वाटत असतं. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आपल्याकडे असावं असंही वाटतं. पण आपण सुपरमॅन नाही. त्यामुळे प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आपल्याकडे असू शकत नाही. मात्र बुद्धीचा योग्य वापर करून आपण स्मार्ट बनू शकतो. यासाठी सतत शिकत राहण्याची आवड आणि जिज्ञासू वृत्ती अंगात असायला हवी. नवं काहीतरी शिकण्याची ओढ तुम्हाला स्मार्ट बनवू शकते. यामुळे बुद्धी तल्लख होते. नातीही सुधारतात. त्यामुळे मुलांनो, सतत शिकत राहा.



## इकडे लक्ष द्या!

योगा टाईम

योगा करताना काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. आसन सुरू करण्याआधी शरीर ताणण्याचे व्यायाम करा. शरीर लवचिक झाल्यावर योगा सुरू करा. जेवणानंतर साधारण तीन तासांनी योगा करता येईल. योगा करताना तहान लागल्यावर फ्रीजमधलं पाणी पिऊ नका. व्यायामामुळे शरीरातली उष्णता वाढलेली असल्याने थंड पाण्याचा तुम्हाला त्रास होऊ शकतो.



चित्र रंगवा



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१)जागतिक आरोग्य संघटनेचं कार्यालय कुठे आहे?
२) ब्रिस्बेन हे शहर कोणत्या देशात आहे?
३) स्टेनलेस स्टीलमध्ये कोणते घटक असतात?
४) भारतातला सर्वात जास्त बोगदे असलेला रेल्वेमार्ग कोणता?
५) 'झैरे' हे कोणत्या देशाचं जुनं नाव आहे?
६) जपान आधी कोणत्या नावाने ओळखला जायचा?
७) जगातलं सर्वात मोठं बेट कोणतं?
८) 'पांढऱ्या हत्तींचा प्रदेश' असं कोणत्या देशाला म्हणतात?
९) एस्कीमो लोकांच्या बर्फापासून बनवलेल्या घरांना काय म्हणतात?
१०) रेडियमचा शोध कोणी लावला?

उत्तरं : १) जिनिव्हा २) ऑस्ट्रेलिया ३) क्रोमियम, लोखंड आणि कार्बन ४) कोकण रेल्वे ५) कांगो ६) निप्पान ७) ग्रीनलँड ८) थायलंड ९) इग्लू १०) मादाम क्युरी




# मायानगरीची मायावी दुनिया

**दिवाळीचे दिवस होते. हवेत छान गारवा होता. मालवण मुंबई एसटीच्या लाल डब्यातून मी मुंबईला निघालो होतो. तेव्हा कोकणरेल्वे अस्तित्वातच नव्हती. सायंकाळी चार वाजता निघालेली गाडी पहाटे पहाटे मुंबईत पोहोचली. नवी मुंबई देखील तेव्हा वाशी म्हणून ओळखली जायची. मानखुर्द पर्यंतच रेल्वे होती. आताचा वाशीचा पुल तेंव्हा अस्तित्वात नव्हता. वाशीची वेस ओलांडुन गाडी मुंबईच्या प्रवेशद्वारातून मार्गक्रमण करू लागली. तसतशी मुंबई नगरीची नजाकत मनात भरु लागली. दिवाळीच्या रोषणाईने उजळून निघालेली मुंबई मनात भरली. रस्त्यावरच्या खांबावरचे दिवे गाडीतून प्रवास करताना दिपमाळेसारखे भासत होते. संपूर्ण मुंबई विविध प्रकारच्या रोषणाईने सजवण्यात आली होती. घरोघरी दरवाजात लावलेले आकाशकंदिल मुंबईतील विवधतेतील एकता दाखवत वातावरणातील सौंदर्य अजूनच खुलवत होते. विद्युत रोषणाई नटलेल्या मुंबईतील नजाकत काही औरच होती. भारतमाता सिनेमा समोरील सिगारेट कंपनी हा तेव्हा एसटीचा थांबा होता. तिथे एस. टी. थांबली मी उतरलो. ही मुंबईतील माझी पहिलीच रात्र होती. अर्थात मी दिवाळीच्या सुट्टीत मुंबईत आलो होतो.**




**श्रीराम शेट्ये**

साल होते १९८३ रविवारचा दिवस उजाडला आणि चित्रपट बघायला जायचे ठरले. संध्याकाळी सहाचा शो होता आम्ही लोकलने ग्रँड रोड स्टेशनला उतरलो. तिथून चालत मिनर्व्हा थिएटरला पोहचलो. तिथे 'शोले' चित्रपट लागला होता. तिकिट काढली आणि सिनेमागृहात विंगमध्ये घुसलो. प्रशस्त असे ते मिनर्व्हा थिएटर पाहताच त्याला 'महाराष्ट्र गौरव' असे का संबोधण्यात येते? याची कल्पना देखील आली. थिएटर मध्ये रंगीत चित्रपट पाहण्याचा माझा हा पहिलाच अनुभव होता. थिएटर मधली लाईट बंद झाली तशी पिन ड्रॉप सायलेन्स स्थिती निर्माण झाली. ७० एम.एम.चा भव्य पडदा आणि सराऊंड साऊंड सिस्टिमची नजाकत असलेल्या त्या थिएटर मध्ये प्रथम जाहिराती सुरू झाल्या. 'दुधसी सफेदी निरमाने लाई' आणि कुर्रम् कुर्रम लिज्जत पापड'. त्यानंतर वेगवान संगीताच्या प्रवाहात चित्रपटाला सुरूवात झाली. आर. डी. बर्मनच्या अप्रतिम पार्श्वसंगीताच्या साथीने आणि 'द्वारका दिवेचा' यांच्या अप्रतिम कॅमेऱ्याच्या हरकतीने केलेली कमाल. आपल्यासमोर उभा रहातो अख्खा रामगड गाव, गावातील वस्ती. भलीमोठी रेल्वेची पटरी त्यावरुन धावत येणारी आगगाडी, त्या गाडीतून दोन खतरनाक कैदी विरू आणि जय यांच्या हाताला बेड्या घालून घेऊन चाललेला पोलीस अधिकारी ठाकूर बलदेवसिंह. एवढ्यात थरारक प्रसंग येतो दरोडेखोरांची टोळी पटरीवर लाकडांचे ओंडके टाकून गाडी थांबवतात व प्रवाशांना लूटायचा प्रयत्न करतात. प्रसंगावधान राखून पोलीस ऑफिस ठाकूर बलदेवसिंह दोन्ही कैद्यांच्या बेड्या आपल्याकडील पिस्तूलाने तोडून टाकतो. कैदी असलेले जाबाज विरु आणि जय दरोडेखोरांवर तूटून पडतात. दरोडेखोरांना मारून पळवून लावतात. हा अगदी सुरूवातीचा सिन. मिनर्व्हा थिएटरच्या तो भव्य पडद्यावर चित्रपट पाहताना आपल्याला वाटते आपण प्रत्यक्ष रामगड मध्ये आहोत. हा प्रसंग आपल्या डोळ्यासमोर घडत आहे. या चित्रपटाची लांबी जास्त होती. त्यामुळे तीन तास आपण परग्रहावर प्रवेश केल्यासारखे रामगड गावाच्या वस्तीत बसंतीचा अल्लडपणा, जय आणि विरूची दोस्ती, ठाकूरची शोकांतिका, विरू आणि बसंतीचे प्रेम, खुंखार दरोडेखोर 'गब्बर सिंग' चा थरार, असरानी आणि जावेद जाफरीचे विनोदी प्रसंग, हेलनचे आयटम साँग हे सर्व पहात असताना आपण प्रत्यक्ष तेथे हजर आहोत असेच वाटते. चित्रपट संपल्यावर आपण भानावर येतो. आपण पडद्यावर चित्रपट पहात आहोत असं एकदाही वाटलं नाही. जणूकाही सर्व घटना आपल्या डोळ्यासमोर घडत आहेत.

सांगायचा मुद्दा एवढाच होता की, त्या सुवर्ण युगात थिएटरमध्ये चित्रपट पाहणे म्हणजे परम भाग्यच होते. टी.व्ही. वर जुने चित्रपट दाखविले जात असत परंतू आतासारखे अनेक चॅनल नव्हते. मोबाईल तर नव्हताच त्यामुळे लोकांची मदार चित्रपट गृहावरच होती. गिरगावातील आणि ग्रँड रोड, मुंबई सेंट्रल परिसरात अनेक थिएटर होते. तिथे हिंदी सिनेमा लागत. मुंबईतील लालबाग, परळ, दादर परिसरात प्रामुख्याने मराठी सिनेमा लागत असत.

शनिवारी, रविवारी सुट्टीच्या दिवशी चित्रपटांना तुफान गर्दी होत असे. अनेक चित्रपट गृहात चित्रपट चार चार आठवडे हाऊसफूल चालत असत. मग काळ्या बाजाराने तिकिटे विकली जात. आपण एकदा कुटूंबासह चित्रपट पहायला गेलो आणि चित्रपट हाऊसफूल असला की हिरमोड होई. म्हणून वाटेल तेवढे दुप्पट - तिप्पट पैसे देऊन लोक चित्रपट पहात असत.

मुंबईत तेंव्हा प्रामुख्याने मिल कामगारांची वस्ती होती. आतासारख्या मॉल, टॉवर संस्कृतीचा उदय झाला नव्हता. बहुतांश कष्टकरी लोक होते. आठवडाभर कष्ट करून थकलेले शरीर आणि शिणलेले मन यांना कुठेतरी उभारी देण्यासाठी विरंगूळा म्हणून लोक सिनेमा पहात असत.

भारतातील कोलकाता येथे जमशेदजी रामजी मदन यांनी १९०७ साली पहिले सिनेमागृह स्थापन केले होते. चाप्लिन सिनेमा किंवा एलफिस्टन पिक्चर पॅलेस हे त्याचे नाव होते. चाप्लिन सिनेमा हे पश्चिम बंगालमधील सर्वात जूने सिंगल स्क्रीन चित्रपटगृह होते. पण जस जसा काळ बदलत गेला तसतसे चित्रपटगृहाचे स्वरुप बदलले. सन १९०७ मध्ये रामजी मदन यांनी एलफिस्टन पिक्चर पॅलेस ची स्थापना केली. बंगाली सुपरस्टार उत्तम कुमार यांचे वडील या थिएटरमध्ये प्रोजेक्टर चालवायचे. नंतर त्या थिएटरचे नाव बदलून मिनर्व्हा सिनेमा असे ठेवण्यात आले. १९८० च्या दशकात कलकत्ता महानगरपालिकेने त्याचे नाव बदलू चाप्लीन सिनेमा ठेवले. त्याआधी १९०७ मध्ये जमशेदजी रामजी मदन यांनी बायोस्कोप आणि थिएटरसाठी हे एक उत्तम लोकप्रिय ठिकाण स्थापित केले होते. पुढे अनेक चित्रपटगृह बांधली गेली. यानंतर १९११ मध्ये मुंबईत रॉयल थिएटर या नावाने त्याची स्थापना झाली. तर दिल्लीतील रीगल सिनेमा १९३२ मध्ये कॅनॉट प्लेसमध्ये बांधण्यात आला. १९३२ मध्ये भारतीय मालकिचे 'गायती' हे थिएटर दक्षिण भारतात स्थापन झाले. भारतीय चित्रपटसृष्टीचे लँडस्केप कालांतराने इतके बदलले की, ते लोक थिएटरकडे आकर्षित होऊ लागले. अनेक भाषांमध्ये चित्रपट बनू लागले. भारतीय चित्रपटांच्या लोकप्रियतेचा अंदाज यावरून लावता येतो की येथे दरवर्षी सर्व भाषांसह एकूण सोळाशे चित्रपट बनतात. सुरुवातीच्या काळात मूकपट बनवले गेले. नंतर हळूहळू बोलक्या चित्रपटांचा काळ आला. यानंतर बदलत्या सिनेमा आणि सिनेमा हॉलचे पर्व सुरू झाले. पूर्वीचे चित्रपट नाटकांच्या स्वरूपात दाखवले जायचे नंतर हळूहळू परिस्थिती बदलली.

भारतीय चित्रपट सृष्टीचा इतिहास चित्रपट युगाच्या सुरुवातीपासूनच आहे. १८९६ मध्ये लंडनमध्ये ल्युमिएर आणि रॉबर्ट पॉल च्या मुव्हींग पिक्चर्सच्या स्क्रीनींग नंतर व्यावसायिक सिनेमॅटोग्राफीने जगभरात खळबळ माजली. हे चित्रपट मुंबईत दाखविले जाऊ लागले. १८९७ चित्रपट निर्माते प्रोफेसर स्टीव्हनसन यांच्या चित्रपट सादरीकरणात कलकत्याच्या स्टार थिएटरमध्ये एक स्टेज शो होता. स्टीवनसनच्या कॅमेऱ्याने आणि प्रोत्साहनाने भारतीय छायाचित्रकार हिरालाल सेनने त्या शोमधील दृश्यांचे चित्रीकरण केले . जे 'द फ्लॉवर ऑफ पार्शिया'' (१८९८) म्हणून प्रदर्शित करण्यात आले. 'द रेसलर्स' (१८९९) एच. एस. भातवडेकर यांचा मुंबईतील हँगिंग गार्डन येथे कुस्तीचा सामना दाखवणारा हा पहिलाच भारतीय माहितीपट होता. १९१३ ते १९३१ पर्यंत भारतात बनविलेले सर्व चित्रपट हे मूकपट होते. ज्यांना आवाज नव्हता त्यांना आंतरशीर्षक होते. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी राजा हरिश्चंद्र (१९१३) प्रदर्शित केला. हा भारतातील पहिला चित्रपट होता. इंग्रजी, मराठी आणि हिंदी आंतरशीर्षकांचा समावेश असलेला हा मूकपट होता. गिरगावातील कोरोनेशन सिनेमागृहात त्याचा प्रिमियर झाला होता. दादासाहेब तोरणे यांचा श्री पुंडलिक (१९१२) हा भारतात बनलेला पहिला चित्रपट असल्याचा दावा काहींनी केला असला तरी काही चित्रपट अभ्यासकांनी असा युक्तीवाद केला आहे की, पुंडलिक हा खरा भारतीय चित्रपट नव्हता. कारण तो फक्त एका चित्रपटाचे रेकॉर्डिंग होता. स्टेज प्ले, ब्रिटीश कॅमेरामनने चित्रित केले आणि त्यावर लंडनमध्ये प्रोसेस करण्यात आली.

दादासाहेब फाळके यांचा राजा हरिश्चंद्र याची एक सत्यवादी राजा हरिश्चंद्र या हिंदू संस्कृत कथेवर आधारीत कथा होती. तिच्या यशामुळे अनेकांनी त्यांना भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रणेते मानले. फाळके यांनी अभिनेता अण्णा साळूंके आणि डी. डी. दबके यांच्यासह सर्व भारतीय क्रू वापरला. चित्रपटाचे दिग्दर्शन, संपादन, प्रोसेसिंग त्यांनी स्वतः केले. फाळके यांनी फ्रेंच दिग्दर्शक एलिस गाय ब्लॅच यांचे 'द लाईफ ऑफ क्राईस्ट पाहिले. येशूला पडद्यावर पहाताना फाळके यांनी हिंदू देवता राम आणि कृष्ण यांची कल्पना केली आणि फिरत्या चित्राचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला.

दादासाहेब फाळके यांनी कठोर मेहनत आणि संशोधन करुन भारतात स्वयंपूर्ण चित्रपट निर्मीतीचा पाया घातला. भारतीय सिनेमांची पहिली शृंखला मदन थिएटर चे पारशी उद्योजक 'जमशेदजी फ्रामजी मदान' यांच्या मालकीची होती. ज्यांनी साखळीसाठी चित्रपटांच्या निर्मिती आणि वितरणाची देखरेख केली होती. यांच्यामध्ये बंगालच्या लोकप्रिय साहित्यातील चित्रपट रूपांतरे आणि दादासाहेब फाळके यांच्या 'सत्यवादी राजा हरिश्चंद्र ' या प्रभावशाली चित्रपटाचा रिमेक होता. लोकांना परवडणारे मनोरंजन म्हणजेच एका आण्यात (एक रूपयाचा सोळावा भाग) एवढ्या कमी पैशात उपलब्ध होते. म्हणूनच चित्रपटांनी भारतभरात सातत्याने लोकप्रियता मिळवली. तरूण निर्मात्यांनी भारतीय समाजिक जीवन आणि संस्कृतीचे घटक सिनेमात समाविष्ट करण्यास सुरूवात केली. इतरांनी जगभरातून नवीन कल्पना आणल्या. जागतिक प्रेक्षक आणि बाजारपेठांना लवकरच भारतीय चित्रपट उद्योगाची जाणीव झाली. ●●

---

# नाट्य कलेच्या चळवळीतील चिरनेर

**दत्तात्रेय म्हात्रे**

नाट्यकलेची समृद्ध परंपरा लाभलेल्या उरण तालुक्यातील चिरनेर हे नाट्य वेडं गाव. या गावाने येथील प्रत्येक कलाकारावर नाटकाचे संस्कार केले आहेत. त्यामुळे गावातील प्रत्येक कलाकाराची पावले रंगभूमीवर उमटली आहेत. मात्र स्वर्गीय नटवर्य नाना पाटील यांचे नाटक वेड जरा सरसच होतं. नाट्यभूषण स्व. प. मा. पाटील (गुरुजी) आणि नटवर्य स्व. नाना पाटील सहदिग्दर्शक स्व. गोमा ठाकूर, ज्येष्ठ दिग्दर्शक श्री वसंत चिर्लेकर, स्व. तुकाराम घरत, स्व. काका पाटील, मारुती पाटील, कृष्णा मुंबईकर, रामकृष्ण खंडू पाटील, बळीराम पाटील, नामदेव पाटील, सदाशिव पाटील, अनंत पाटील, नरेश मोकल, नागेश ठाकूर, यशवंत मोकल, जनार्दन हातनोलकर, बाळाराम म्हात्रे, मारुती ठाकूर, काशिनाथ गोंधळी, हरिश्चंद्र ठाकूर तसेच गावातील अन्य कलाकारांची नाट्यकारकिर्द आमच्यासारख्या नाट्य कलाकारांना आदर्श आणि मार्गदर्शक ठरली आहे. असे एकेकाळी नाटकातून ग्रामीण प्रेक्षकांची मने जिंकणारे चिरनेर येथील दिग्दर्शक प्रमोद नामदेव पाटील आणि रंगनायक विजय गजानन पाटील यांनी चिरनेर गावातील नाट्य कलेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, कृषीवलचे प्रतिनिधी दत्तात्रेय म्हात्रे यांच्याशी संवाद साधत, नाट्यकलेविषयी उत्स्फूर्तपणे भाष्य केले. यावेळी त्यांनी भावूक होऊन, गतकाळातील नाट्य आठवणी जाग्या केल्या.

नाट्यवेड्या चिरनेरच्या मराठी ग्रामीण रंगभूमीने अनेक कौटुंबिक, सामाजिक, ऐतिहासिक नाटकांना मूर्त रूप दिले असल्याचा उल्लेख करुन, या नाटकांनी प्रेक्षकांना कसे खिळवून ठेवले होते. याविषयीचाही त्यांनी अनुभव कथन केला. एकीकडे सामाजिक आणि विनोदी नाटकांची धूम असताना, त्याकाळी ऐतिहासिक नाटकांनी ग्रामीण भागात माहोल निर्माण केला होता. याचे उदाहरण देताना, 'स्वातंत्र्याची सिंहगर्जना' या ऐतिहासिक नाट्यप्रयोगाच्या एका प्रवेशाच्या प्रसंगात, तानाजी मालुसरे (बाळाराम म्हात्रे) आणि कान्होजी जेधे (गोमा ठाकूर) यांनी नाट्य रंगमंचावर प्रत्यक्ष घोड्यावर स्वार होऊन प्रवेश करून, नाटकातील संवाद साधला होता. या प्रसंगाची आठवण येथील प्रेक्षकांसाठी आणि कलाकारांसाठी सुखकारक असल्याचे सांगून, येथील नाटकांच्या सर्व आठवणी त्या काळच्या प्रेक्षकांच्या मनात आजही ताज्यातवान्या असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वी चिरनेर गावातील माघी गणेशोत्सव, गावदेवी यात्रा, रामनवमी, शिवजयंती, गोरोबाकाका उत्सव या आणि अन्य कार्यक्रमाच्या निमित्ताने दरवर्षी हमखास नाट्यप्रयोग सादर केले जात असत. दरम्यान चिरनेर गावात मूळ ग्रामीण नाट्य चळवळ उभारून ज्यांनी वर्षानुवर्ष उमेदीने प्रयत्न करून नाट्यचळवळ रुजवली आणि ती जोपासली. त्या नाट्यकलेला गेल्या काही वर्षांपासून उतरती कळा लागली आहे. या नाट्यकलेला नवसंजीवनी देण्यासाठी कलाकारांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे विजय पाटील व प्रमोद पाटील यांनी सांगितले. रंगभूमी हे आमचे मंदिर आहे. आणि नटराज हे आमचे आराध्य दैवत असून, चिरनेरच्या श्री महागणपतीचा चिरनेरच्या या रंगभूमीला मोठा आशीर्वाद आहे. नाट्यभूषण प.मा. पाटील, नटवर्य नाना पाटील हे नाट्यकला प्रांतातील खरे यांत्रिक असून, ते आमच्या गुरुस्थानी आहेत. त्यांनी आम्हाला नाटकाचे खरे बाळकडू पाजले आहे. त्या काळातील आमचा नाटकाचा प्रवास काटेरी होता. पण तो सुखाचा झाला हे मात्र तितकच खरं आहे.







नाट्यभूषण प.मा. पाटील गुरुजी यांनी ग्रामीण नाट्यसृष्टीबरोबर वाटेला सोबत हवी, महामानव अशा मुंबईतील अनेक व्यावसायिक नाटकातून त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्या आहेत. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत मृगजल हे नाटक सर्वोत्कृष्ट ठरले. या नाटकात नटवर्य नाना पाटील यांना सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले. ठाणा वाडा येथे सादर झालेले, '**का व्यर्थ जन्मले जगी**' या जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धेत नाना पाटील हे सर्वोत्कृष्ट अभिनयाचे मानकरी ठरले. प्रमोद पाटील, मोरेश्वर मोकल, जगदीश घरत तसेच अन्य कलाकारांनाही स्पर्धेतील नाटकातून पारितोषिके प्राप्त झाली. दरम्यान चिरनेरच्या ग्रामीण रंगभूमिवर शिवाजी, संभाजी या व्यक्तिरेखेतून प.मा. पाटील, नाना पाटील, वसंत चिर्लेकर, धनाजी मुंबईकर, गजानन पाटील, नामदेव पाटील, दामोदर मुंबईकर, गणपत मोकल, प्रमोद पाटील, राजेंद्र जुवेकर, संजय पाटील, जगदीश घरत, नित्यानंद मोकल, धनेश ठाकूर, जनार्दन केणी या कसलेल्या कलाकारांचा अभिनय पहायला मिळाला. तर खल भूमिकांमधून नाना पाटील, वसंत चिर्लेकर, विजय पाटील, राजेंद्र जुवेकर, जगदीश घरत, आनंद चिर्लेकर, सूर्यकांत म्हात्रे, सुरेश पाटील, बळीराम ठाकूर, गणपत म्हात्रे, चंद्रकांत ठाकूर, वसंत ठाकूर, महादेव म्हात्रे, नारायण फोफेरकर या मातब्बर कलाकारांनी आपल्या अभिनयाचे रंग उधळले. विनोदी कलाकार म्हणून तुकाराम घरत, मारुती ठाकूर, एकनाथ म्हात्रे, जनार्दन ठाकूर, मोरेश्वर मोकल, सिद्धेश घरत, कृष्णा मुंबईकर, संजय मोकल, मिलिंद ठाकूर, हिराजी ठाकूर, प्रमोद पोवळे, अशोक पाटील, विलास पाटील या सर्वांनी विनोदी भूमिकांमधून लोकांना पोटभर हसविले. तर त्याकाळी ना. प. म्हात्रे, जयवंत पाटील, मुकुंद हातनोलकर, दत्तात्रेय ठाकूर, सदाशिव पाटील या कलाकारांनी स्त्रीपात्रे रंगवली होती. तर नायकाच्या चरित्र भूमिकांमध्ये वावरणारे अनंत पाटील, संतोष ठाकूर, अशोक म्हात्रे, धनाजी ठाकूर, राजेश ठाकूर, प्रकाश पाटील, घनश्याम पाटील, केशव फोफेरकर, अनंत नारंगीकर,अविनाश म्हात्रे, प्रशांत पाटील, संकेत पाटील, चंद्रकांत ठाकूर, मनोज म्हात्रे यांनी आपल्या अभिनयाची छाप पाडली. बाळकृष्ण चिर्लेकर, प्रमोद पाटील, चंद्रकांत ठाकूर, संतोष ठाकूर, गणपत म्हात्रे,संतोष म्हात्रे, परशुराम मोकल, मारुती गोंधळी, धनंजय गोंधळी, कृष्णा कडू, गोपाळ केणी, कृष्णा केणी, वसंत मोकल यांनी खानाच्या भूमिकेतून अभिनयाचे दीप उजळले. परिणामी येथील कलाकारांनी कठोर परिश्रमाच्या जोरावर ग्रामीण नाट्यसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं. ग्रामीण रंगभूमीच्या श्रेष्ठ नटांच्या प्रभावळीत आजही श्रेष्ठ रंगनायक म्हणून रा. शि. म्हात्रे, मुकुंद म्हात्रे, यशवंत मोकल, शशांक ठाकूर, काशिनाथ गोंधळी परशुराम रेवसकर, गोपीनाथ गोंधळी, बाळकृष्ण रसाळ, प्रभाकर ठाकूर, रामदास म्हात्रे, हरिश्चंद्र चौलकर, गजानन चौलकर, अरुण शिंदे अशा अनेक कलाकारांची नावे अग्रक्रमाने घेतली जात आहेत. चिरनेर रंगभूमीवरील नाटकांची वाटचाल खरोखरच चौफेर व अदभूत आहे. अर्थात येथील कलाकारांचा रंगभूमीवरचा जबर अनुभव, आणि आपल्या शैली व उत्साह यामधून त्यांनी विलक्षण रंग भरला. चिरनेर रंगभूमीवरील नाट्य प्रवासात रायगडाला जेव्हा जाग येते, पावन खिंडीचा रणझुंझार, हे राज्य श्रींचे, आग्र्याहून दख्खन, रायगडचा राजेश्वर, वारणेचा वाघ, रामची ताई, जहागीरदार, माझं कुंकू ,अखेरचे अश्रू, कुलांगार, दैव जाणीले कुणी, जन्मदाता, आयुष्याचा खेळ, मानी मराठा, मर्द मराठा दख्खनचा, महाराष्ट्राचा बहुरूपी, अफझलखान, स्वातंत्र्याची सिंहगर्जना, वाट चुकलेला पाईक, स्वराज्याचा नंदादीप, रायगडचा राजेश्वर यासारख्या सामाजिक आणि ऐतिहासिक नाटकांनी चिरनेरच्या ग्रामीण रंगभूमीवर इतिहास घडविला.

> **नाटकाचे कथानक साकारताना, त्यामध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये प्रसंगानुरूप त्यांच्यात होणाऱ्या मानसिक आणि भावनिक प्रतिक्रिया आणि आपापसातील संवाद हे प्रेक्षकांना खरे वाटणारे असावेत. तरच ते नाटक प्रेक्षकांना आपलं वाटतं.**
>
> **– प्रमोद पाटील (दिग्दर्शक),**
> **विजय पाटील (रंगनायक)**
> **(श्री गणेश नाट्य मंडळ चिरनेर मुळपाडा)**

एकेकाळी चिरनेरच्या रंगभूमीवरील नाट्य प्रयोग पाहण्यासाठी उरण, पेण, पनवेल पंचक्रोशीतील प्रेक्षक हजेरी लावत असत. हे मात्र तितकच खरे आहे. नाट्यभूषण प. मा. पाटील (गुरुजी) नटवर्य नाना पाटील, ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांनी नाट्यक्षेत्रात अमीट छाप पाडली आहे. नाटकातील पात्र सजीव करण्याचे आव्हान एक दिग्दर्शक म्हणून, ते पेलत आले आहेत. त्यांनी उरण, पेण, पनवेल पंचक्रोशीतील अनेक कलाकार घडविले आहेत. त्यांनी नाट्य कलाकार घडविण्याची जी भूमिका बजावली आहे. ती अविस्मरणीय व गौरवास्पद आहे. वेगवेगळ्या नाटकातून त्यांनी आपली विविधता जपली. पण नाट्यसृष्टीत वावरताना ते कुठल्याही मोठेपणात वावरले नाहीत. त्यांनी कलाकार आणि दिग्दर्शक अशा दोन्ही पातळ्यांवर नाटकातून भूमिका साकारण्याचा समतोल साधला.

त्यानंतर प्रमोद पाटील, राजेंद्र जुवेकर, मोरेश्वर मोकल, संतोष ठाकूर या कलाकारांनी दिग्दर्शनाची धुरा आपल्या हाती घेतली आहे. चिरनेरची नाट्य चळवळ पुन्हा उमेदीने उभी रहावी, हीच रसिक प्रेक्षकांची अपेक्षा. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)